
गुरुवार, २८ ऑक्टोबर २०२१
• वर्ष १४ • अंक १०१
www.ramprahar.com

# राम प्रहर

• पाने ६ • किंमत ₹२ • रायगड

## भ्रष्ट, घोटाळेबाज विवेक पाटलांची दिवाळीही जेलमध्येच

**कोठडीत ८ नोव्हेंबरपर्यंत वाढ**



**पनवेल :** कर्नाळा बँकेचे चेअरमन आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांच्या कोठडीत न्यायालयाने आता ८ नोव्हेंबरपर्यंत वाढ केली आहे. त्यामुळे अटक झाल्यानंतरची पहिली दिवाळीही त्यांना आता जेलमध्येच घालवावी लागेल. कर्नाळा बँकेतील ५१२ कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या घोटाळाप्रकरणी अटक करण्यात आलेले आणि तळोजा जेलमध्ये असलेले विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावर सुनावणी सुरू आहे. या सुनावणीदरम्यान बुधवारी (दि. २७) ईडी आणि राज्य सरकारचे विशेष सरकारी वकील वेणेगावकर यांनी सत्र न्यायालयात आपले म्हणणे मांडले. वेणेगावकर यांचा युक्तीवाद अद्याप पूर्ण झालेला नाही. त्यामुळे न्यायालयाने या प्रकरणी पुढील सुनावणी १२ दिवसांनी म्हणजे ८ नोव्हेंबर रोजी ठेवली आहे.

**अंतरंग**

दिवाळी खरेदीसाठी उत्साह; बाजारपेठा सजल्या/३

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे अभियान/५

भारत वर्ल्डकप जिंकेल! ब्रेट ली चे भाकीत/६

# ‘जलयुक्त शिवार’ला क्लीन चिट

## देवेंद्र फडणवीस यांच्या सत्कार्यावर जलसंधारण विभागाचे शिक्कामोर्तब

**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकारने सत्तेत आल्यानंतर माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या जलयुक्त शिवार अभियानातील अनियमिततेची चौकशी करण्याची घोषणा केली होती, परंतु या चौकशीत ‘जलयुक्त शिवार’ला क्लीन चिट दिल्याची सूत्रांची माहिती आहे.

जलयुक्त शिवार अभियानामुळे पीक पेरणी क्षेत्र आणि उत्पन्नात वाढ झाली तसेच शेतकऱ्यांच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा झाली, असा निष्कर्ष राज्य सरकारच्या जलसंधारण विभागाने आपल्या अहवालात काढला आहे. योजनेत अनियमितता झाल्याचा आक्षेप ‘कॅग’च्या अहवालात घेतला गेला होता. आता या योजनेतील ५८ हजारांपेक्षा जास्त झालेल्या कामांचा आढावा घेऊन कॅगच्या अहवालात करण्यात आलेला हा आक्षेप फेटाळण्यात आला आहे.

कॅगने या अभियानात तांत्रिक त्रुटी होत्या तसेच कामात अनियमितता होती, असे ताशेरे ओढले होते. या योजनेचे जे उद्दिष्ट होते ते पूर्ण झाले नाही, असेही अहवालात म्हटले होते, मात्र आघाडी सरकारच्या जलसंधारण विभागाने कॅगचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत केलेल्या कामांमुळे खरीप आणि रब्बी हंगामातील पिकांसाठी सिंचनाची सुविधा निर्माण झाली. पाणी पातळी वाढली आणि कामाची पारदर्शक अंमलबजावणी झाली, असे जलसंधारण विभागाने आपल्या अहवालात म्हटले आहे.


दरम्यान, जलयुक्त शिवार अभियानाला बदनाम करणाऱ्या महाविकास आघाडीने या योजनेची चौकशी करून स्वतःच आपले दात आपल्या घशात घातले, अशा प्रकारचे चित्र आहे, अशी प्रतिक्रिया भाजप नेते आमदार अ‍ॅड. आशिष शेलार यांनी दिलीय.



**जलयुक्त शिवार अभियानावर टीकाकारांनी टीका केली होती, पण आता सरकारने स्वत:च उत्तर दिलंय. चुकीच्या गोष्टीचे मी समर्थन करणार नाही, पण त्यासाठी संपूर्ण योजनेला बदनाम करणे चुकीचे होईल.**

**–देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री तथा विरोधी पक्षनेते**

### ‘सत्याचाच विजय होतो!’



जलयुक्त शिवार अभियानाला क्लीन चिट देण्यात आल्यानंतर भाजप नेते व माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सत्याचाच विजय होतो, अशी प्रतिक्रिया दिली आहे. एखाद्या ठिकाणी झालेल्या त्रुटीच्या आधारे संपूर्ण योजनेला नाव ठेवणे चुकीचे आहे. तेच ठाकरे सरकारने केले. हे सरकार बदनामीचे काम खूप चांगल्या रितीने करते, असा टोलाही मुनगंटीवार यांनी लगावला आहे.

# सुनील तटकरेंनी फुसके बार फोडणे बंद करावे!

## आमदार रविशेठ पाटील यांचा पलटवार

**पेण : रामप्रहर वृत्त**

भंकपबाजीत माहीर असणाऱ्या खासदार सुनील तटकरे यांनी फुसके बार फोडणे बंद करावेत, अशी टीका माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांनी केली आहे.

पेण नगर परिषदेच्या आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसची निर्विवाद सत्ता येईल, असे भाष्य रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी पेण येथील पक्षप्रवेश कार्यक्रमात केले होते. त्याचा आमदार रविशेठ पाटील यांनी समाचार घेतला आहे. पेण पालिकेवर सत्ता स्थापन करण्याचे स्वप्न सुनील तटकरेंनी पाहू नये. येथे घड्याळाची टिकटिक चालू देणार नाही, असे प्रत्युत्तर आमदार रविशेठ पाटील यांनी दिले.

खासदार तटकरे खोटे बोलण्यात आणि खोटी आश्वासने देण्यात पटाईत आहेत, मात्र ते जलसंपदामंत्री असताना त्यांनी पेणचा पाणी प्रश्न सोडविला नाही आणि अर्थमंत्री असताना पेण अर्बन बँकेचा प्रश्न मार्गी लावला नाही. आता ते पेणमधील जनतेचे प्रश्न काय सोडविणार, असा सवाल आमदार पाटील यांनी केला आहे.



आमदार पाटील खासदार तटकरेंना उद्देशून पुढे म्हणाले की, मागील पेण पालिकेच्या निवडणुकीत सर्व पक्ष एकत्र असताना तुम्ही परिवर्तन करू शकला नाहीत, तर या वेळी काय एकहाती सत्ता घ्याल? आधी घड्याळाची निशाणी घेऊन निवडणूक लढवून दाखवा.


सुनील तटकरे यापूर्वी राज्यात मंत्री होते, पालकमंत्री होते, पण पेण खारेपाट भागातील पाणीप्रश्न त्यांना सोडविता आला नाही. राज्यात भाजपची सत्ता आल्यावर तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निधी मंजूर केला. याचे श्रेय घेण्याचे काम इतर लोक करतात. त्यांची मला कीव येते, अशा शब्दांत आमदार पाटील यांनी तटकरेंना फटकारले.

आम्ही केलेल्या विकासकामांची पोचपावती पेणची जनता आमची विजयाची हॅट्ट्रिक पूर्ण करून देईल, असा विश्वासही आमदार पाटील यांनी व्यक्त केला.

## आर्यन खानप्रकरणी तारीख पे तारीख!

**आज पुन्हा सुनावणी**

**मुंबई : प्रतिनिधी**



क्रुझ ड्रग्जप्रकरणी आर्यन खानच्या जामिनावर मुंबई उच्च न्यायालयाने पुन्हा एकदा पुढची तारीख दिली आहे. आर्यनसह इतर आरोपींसंदर्भातील युक्तीवादाला बुधवारी अधिक वेळ लागल्याने न्यायालयाने जामीनावर गुरुवारी (दि. २८) पुन्हा सुनावणीचा निर्णय घेतला.

आर्यन, अरबाज मर्चंट आणि मुनमुन धामेचा यांच्या जामीन अर्जावर उच्च न्यायालयात सुनावणी झाली. माजी अ‍ॅटर्नी जनरल मुकुल रोहतगी यांनी आर्यनची बाजू मांडली. अरबाजसाठी ज्येष्ठ वकील अमित देसाई यांनी काम पाहिले, तर अमली पदार्थविरोधी दलाकडूनही (एनसीबी) जोरदार युक्तीवाद करण्यात आला.

# मराठा आरक्षणासाठी लाँग मार्च काढणार –संभाजीराजे



## आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले पनवेल नगरीत स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

न्यायालयात मराठा समाज आरक्षण नाकारले गेल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचे १३वे वंशज खासदार संभाजीराजे यांची मराठा समाजाला एकसंघ करण्यासाठीची जनसंवाद यात्रा मंगळवारी (दि. २६) रायगड जिल्ह्यात आयोजित करण्यात आली होती. या यात्रेचा समारोप पनवेलमध्ये झाला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी संभाजीराजेंचे पनवेल नगरीत स्वागत केले. यानंतर आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या सभेत मराठा आरक्षणासाठी लाँग मार्च काढला जाईल, असा इशारा संभाजीराजेंनी राज्य सरकारला दिला.

सर्वोच्च न्यायालयाने मराठा समाजाला आरक्षण देता येणार नाही असा निकाल दिल्यानंतर पुन्हा या लढ्याला सुरुवात तसेच मराठा समाजाला एकसंघ करण्यासाठी रायगडच्या पवित्र भूमीतून खासदार संभाजीराजे यांची जनसंवाद यात्रा मंगळवारी आयोजित करण्यात आली होती. या यात्रेचा समारोप पनवेल शहरात झाला. या वेळी संभाजीराजेंनी शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या यात्रेंतर्गत फडके नाट्यगृहात सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी संभाजीराजेंनी सांगितले की, दुःखी असलेल्या मराठा समाजासाठी हा लढा सुरू असून आरक्षणासाठी मुंबई ते पुणेदरम्यान लाँग मार्च काढला जाणार आहे. (पान २ वर..)

## निवडक

### दिवाळीसाठी शासनाकडून मार्गदर्शक सूचना जाहीर

**मुंबई :** अवघ्या काही दिवसांवर दिवाळीचा सण आला आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य गर्दी किंवा गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेता राज्य शासनाकडून दिवाळीसाठी मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये नागरिकांनी फटाके फोडण्याचे टाळून दिव्यांची आरास करून उत्सव साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### खेलरत्न पुरस्कारांची घोषणा; ११ खेळाडूंचा होणार सन्मान

**नवी दिल्ली :** मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यात ऑलिम्पिक सुवर्णपदकविजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा, क्रिकेटपटू मिताली राज, फुटबॉलपटू सुनील छेत्री, कुस्तीपटू रवी दहिया, बॉक्सर लवलीना बोरगोहेन, हॉकीपटू पीआर श्रीजेश, बॅडमिंटनपटू प्रमोद भगत, सुमित अंतिल, अवनी लेखरा, कृष्णा नगर, एम. नारवाल यांचा समावेश आहे. ११ ‘खेलरत्न’सह ३५ अर्जून पुरस्कारांची घोषणा झाली.



(अधिक छायाचित्रे पान ६ वर..)

# नावड्यात नेत्रतपासणी शिबिर, मोफत चष्मे वाटप

■ **स्व. लक्ष्मणशेठ पाटील आणि स्व. अविनाश म्हात्रे-पाटील यांच्या स्मरणार्थ उपक्रम**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्व. लक्ष्मणशेठ पाटील आणि स्व. अविनाश म्हात्रे-पाटील यांच्या स्मरणार्थ लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या सहकार्याने नेत्रतपासणी शिबिर व मोफत चष्मे वाटप उपक्रमाचे आयोजन बुधवारी (दि. २७) नावडे येथे करण्यात आले होते. या उपक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

नावडे येथील जि. प. शाळेत सचिन लक्ष्मणशेठ पाटील व ग्रामस्थ मंडळाच्या वतीने आरोग्यदायी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात नेत्रतपासणी, मोफत चष्मे वाटप तसेच अल्पदरात मोतीबिंदू शास्त्रक्रिया करण्याची सोय उपलब्ध करण्यात आली होती. या उपक्रमाला नागरिकांचा उदंड असा प्रतिसाद लाभला. (पान २ वर..)


**आमदार प्रशांत ठाकूर, अरुणशेठ भगत यांची लाभली प्रमुख उपस्थिती**

## महापालिका, नगर परिषदांमधील सदस्य संख्या वाढणार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील झपाट्याने वाढलेली लोकसंख्या तसेच नागरी विकास योजनांचा वेग वाढविण्याची गरज लक्षात घेऊन महानगरपालिका व नगर परिषदांतील निर्वाचित सदस्यांच्या संख्येमध्ये वाढ करण्याचा निर्णय बुधवारी (दि. २७) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

सध्या महापालिकांतील सदस्य संख्या किमान ६५ व कमाल १७५ आहे, तर नगर परिषदांमधील सदस्य संख्या किमान १७ व कमाल ६५ आहे. लोकसंख्यावाढीचा सरासरी वेग गृहीत धरून अधिनियमात नमूद महापालिका व नगर परिषदांच्या किमान सदस्य संख्येत १७ टक्के वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. किमान सदस्य संख्या वाढविल्याने पुढील सदस्य संख्याही वाढेल व त्यामुळे पर्याप्त सदस्य संख्या निश्चित होईल. (पान २ वर..)

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
गुरुवार, दि. २८ ऑक्टोबर २०२१ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

■ १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
■ २. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
■ ३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
■ ४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
■ ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
■ ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

■ ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
■ ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
■ ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
■ १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
■ ११. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
■ १२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
■ १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
■ १४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
■ १५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
■ १६. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोवॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

■ १. काळभैरव कार्यालय, कळंबोली
■ २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल


# पनवेलमध्ये हायमास्टचे उद्घाटन

## राजू सोनी यांच्या नगरसेवक निधीतून सुविधा



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका प्रभाग क्रमांक १९मध्ये गुणे हॉस्पिटल, भाजी मार्केट आणि टपाल नाका येथे काही दिवसांपूर्वी राजू सोनी यांच्या नगरसेवक निधीतून हायमास्ट पथदिवे बसविण्यात आले होते. याचे उद्घाटन मंगळवारी (दि. २६) सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. गिरीश गुणे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास नगरसेवक राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, महापालिका अधिकारी प्रीतम पाटील, भाजप प्रभाग १९चे अध्यक्ष पवन सोनी, चंद्रकांत मंजुळे, राजू कोळी, मंदार देसाई, तुषार कापरे, अरुण मालपाणी, सुनील खळदे, प्रशांत गायकवाड, सुभाष पवार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## दीपावलीनिमित्त कोशिश फाऊंडेशनतर्फे पोस्टर आणि ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दीपावलीचे औचित्य साधून कोशिश फाऊंडेशनच्या वतीने पोस्टर स्पर्धा तसेच ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या दोन्ही स्पर्धा पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांसाठी आहेत. ७ वर्षांखालील, ८ ते १५ वर्षे, १६ ते २१ वर्षे आणि २२ वर्षांवरील अशा चार गटांत या स्पर्धा होणार असून ’ध्वनी प्रदूषण’, ’ये दिवाली शांतीवाली’ आणि ’वोकल फॉर लोकल’ हे तीन विषय यासाठी आहेत.

स्पर्धेत नावनोंदणीची अंतिम तारीख १० नोव्हेंबर असून अधिक माहितीसाठी ७७५७०००००० या क्रमांकावर संपर्क साधावा. पोस्टर स्पर्धेतील एकूण विजेत्यांना ३५ हजार तसेच ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेतील एकूण विजेत्यांना ३५ हजार रुपयांची पारितोषिके देण्यात येणार येणार आहेत. या स्पर्धेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेचे सभागृह नेते आणि कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी केले आहे.

**भरघोस बक्षिसे**



# दिवाळीनंतर सर्व घोटाळे उघड करणार

## भाजप नेते किरीट सोमय्या यांचा इशारा

**लातूर : प्रतिनिधी**

दिवाळीनंतर सर्व घोटाळे उघड करणार, असा इशारा भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी दिला. ते बुधवारी (दि. २७) लातूर येथील स्वानंद मंगल कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.



सोमय्या या वेळी म्हणाले की, राज्यातील ठाकरे-पवार सरकार हे माफियांचे सरकार असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मालमत्तेवरील धाडीत तब्बल १६ हजार ५० कोटींची मालमत्ता आढळून आली आहे. त्यामुळे हे सरकार माफियांचे आहे. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत माफिया लोक जसे काबिज करतात तसे काम येथे झाले आहे. राज्यातील इतर साखर कारखान्यासारखेच या जिल्ह्यात देखील कारखान्यात घोटाळे झाले आहेत. दिवाळीनंतर लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील बालाघाट म्हणजेच आजचा सिद्धी शुगर आणि उदगीर तालुक्यातील तोंडार येथील प्रियदर्शनी हे दोन्ही सहकारी साखर कारखाने कवडीमोल भावाने विकले गेले आहेत. या कारखान्यांसह अर्धाडझनभर सहकारी साखर कारखाने देशमुख परिवाराने गिळंकृत केले आहेत. हा आरोप करीत दिवाळीनंतर हे सर्व घोटाळे उघड करणार असा इशारा सोमय्या यांनी दिला.

पुणे पिंपरी चिंचवड महापालिकेत स्मार्ट सिटी प्रकल्प घोटाळ्यासंदर्भात शिवसेना नेते संजय राऊत यांनी पाठपुरावा करण्याबाबत पाठवलेल्या पत्राचेही किरीट सोमय्या यांनी राऊतांना उत्तर दिले आहे. राज्य सरकारने सीबीआयला चौकशी करण्यास सांगावे, आपण पाठपुरावा करू असेही सोमय्या यांनी सांगितले. जरंडेश्वर कारखाना प्रकरणात १८४ कोटी संपत्ती सापडली, मात्र शरद पवार आणि अजित पवार हे बनवाबनवी करीत असल्याचा आरोपदेखील सोमय्या यांनी केला आहे.

या वेळी माजी मंत्री आमदार संभाजी पाटील यांनी जिल्ह्यातील बालाघाट व प्रियदर्शनी कारखाना, जागृती शुगरने साडेअकरा हजार शेतकऱ्यांची केलेली फसवणूक, जिल्हा बँकेने अनेक संस्थांना कर्ज पुरवठा केला आहे. त्याची चौकशी करावी याची कागदपत्रे सोमय्या यांना सुपूर्द केली. भाजप जिल्हाध्यक्ष आमदार रमेश कराड, आमदार अभिमन्यू पवार आदी या पत्रकार परिषदेमध्ये उपस्थित होते.

# आरिवलीत विविध सामाजिक उपक्रम

## ■ भाजप नेते अरुणशेठ भगत, सभागृह नेते परेश ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे पनवेल तालुका चिटणीस तथा कसळखंड ग्रामपंचायतीचे सदस्य महेंद्र गोजे यांच्या वाढदिवसानिमित्त आरिवली येथे मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिर, ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार व दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव अशा विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत आणि पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.





महेंद्र गोजे यांच्या वाढदिवसानिमित्त रायगड जिल्हा परिषदेच्या पनवेल तालुक्यातील आरिवली येथील शाळेत मोफत नेत्र तपासणी शिबीर व चष्मे वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्सफूर्द प्रतिसाद लाभला. या वेळी ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. तसेच दहावीमध्ये राज पाटील, प्राप्ती पाटील, वरद लबडे, आणि बारावीमध्ये चिन्मय भगत मानसी पाटील यांनी उल्लेखनीय कामगिरी केली असून, त्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला.

या वेळी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप नेते आप्पा भागीत, माजी सरपंच राम गोजे, पुंडलीक पाटील, वासुदेव गोजे, महादू गोजे, गोपाळ राऊत, हरिभाऊ पाटील, अनंता पाटील, खंडू गोजे, सिताराम गोजे, मारुती गोजे, काशिनाथ दाभणे, सुरेश गोजे, राम राऊत, प्रवीण गोजे, पुंडलिक गोजे नरेश राऊत, बळवंत पाटील, गोविंद्र पाटील, मारुती पाटील, काशिनाथ पाटील, राजू पाटील, अरुण पाटील, तानाजी पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी महेंद्र गोजे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# पनवेल मनपाच्या विविध भागांत अंडरग्राऊंड कचराकुंडी तयार करा; नगरसेविका दर्शना भोईर यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या विविध भागांमध्ये अंडरग्राऊंड कचराकुंडी तयार करण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका दर्शना भोईर यांनी निवेदनाद्वारे महापालिकेचे प्रभारी नगरसचिव यांच्याकडे केली आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने शहरातील ठिकठिकाणी कचरा कुंड्या उभारलेल्या असुन या कचरा कुंड्यांमधून दैनंदिन कचरा उचलण्याचे काम केले जाते, परंतु काही कारणास्तव कचरा उचलला गेला नाही तर तो कचरा त्या ठिकाणी तसाच पडुन राहतो व त्यामधील काही कचरा वाऱ्याने इतरत्र पसरतो. त्यामुळे या भागाचे विदृपीकरण होते तसेच काही कचरा सडल्याने मोठी दुर्गधी निर्माण होते. त्यामुळे या समस्येवर बेळगाव महापालिकेद्वारे अंडरग्राऊंड कचरा कुंड्या उभारलेल्या असुन या कचरा कुंड्यामधून नियमीतपणे कचरा उचलला जातो. अशाच प्रकारच्या कचरा कुंड्या आपल्या महापालिकेच्या हद्दीत उभारल्यास शहराचे विद्रुपीकरण थांबण्यास मदत होणार आहे.

पनवेल महापालिकेच्या विविध भागांमध्ये अंडरग्राऊंड कचरा कुंडी तयार करण्याबाबतचा विषय आगामी होणाऱ्या महासभेमध्ये पटलावर घेऊन त्यावर विचारविनीमय करून पुढील कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका भोईर यांनी दिलेल्या निवेदनात केली आहे.

# खानाव येथे मोफत आधार कार्ड शिबिराचा उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष चिंध्रण पंचायत समितीच्या वतीने भारतीय पोस्ट आपल्या दारी या उपक्रमांतर्गत मोफत आधार कार्ड शिबिर आयोजित करण्यात आले होते. पनवेल तालुक्यातील खानाव येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली.

या वेळी उपसरपंच बाळाराम पाटील, चंदा वारदे, पुंडलीक तवले, एकनाथ फराड, दत्तात्रेय दारदे, बळीराम भोईर, गणेश तातरे, विजय पाटील, निलेश वारदे, रमेश वारदे, प्रकाश जाधव, रोशन फराड, अशोक कर्णुक, रवि पाटील, बाबुराव तोडेकर आदी उपस्थित होते. या शिबिराला नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला.

# शेडुंगच्या विल्फ्रेड लॉ कॉलेज विद्यार्थी समूहातर्फे ग्रंथालयाला संविधान भेट

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

शेडुंग येथे असणाऱ्या सेंट विल्फ्रेड लॉ कॉलेजमध्ये झालेल्या दीक्षांत समारंभात विद्यार्थी समूहाच्या प्रमुखांकडून लॉ कॉलेज ग्रंथालयाला संविधानाच्या पुस्तकाची भेट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. मृत्युंजय पांडे यांचेकडे सुपूर्द करण्यात आली. या सोहळ्याला संस्थेचे चेअरमन डॉ. केशव बढाया यांच्यासह आमदार महेश बालदी उपस्थित होते.



लॉ कॉलेजमधील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम अध्यापन स्वयंम प्रक्रिया म्हणून गुगल मिट रात्रशाला उपक्रम सुरू केला आहे. याकामी विद्यार्थी निलेश म्हात्रे, संजय गायकवाड, अमोलराजे पाटील, संदीप नानेकर, मनोहर देशमुख, अरविंद शिलीमकर, योगेश भोसले, शरद निकुंभ, संजय सदाले, संदेश घरत, आकाश सोनवणे, हरेश्वर मुंडे, स्वप्नील साळुंखे, नरेश म्हात्रे, संजीव बी एम, प्रफुल्ल गुडेकर, हर्षद पाटील, विलास बागुल, श्रीकृष्ण आपटे, जयराम गायकवाड, विशाल थोरात, सागर नावडे, विलास तारे, रवींद्र लंकेश्वर, नानासाहेब वाघमोडे, आकाश आडोळे, रुता सारगे, मानसी पाटील, पूनम वाघमोडे, स्मिता कुथे, राजेश्री महाजन, हर्षदा जांभूळकर, पूर्वी कोशे, रुपाली हरांशिखरे, योगिता म्हात्रे, रुक्मिणी धायगुडे, अस्मिता शिंदे, सुप्रिया कोळेकर, हर्षदा मुंडे, मनीषा डायरे, प्रणिता निगुडसे, दर्शना धारवाड आदींसह अन्य विद्यार्थी यांचा सहभाग होता.

## महिलेची फसवणूक करून दागिने लुबाडले

**पनवेल :** कामोठ्यातील एक महिला खरेदीसाठी बाहेर पडली होती. या वेळी अनोळखी व्यक्तीने गरीब महिलांना साड्या वाटप होणार असल्याचे सांगून फसवणूक करून त्या महिलेचे दागिने लुबाडले. महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू केलाय.


**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**जाहीर ई-निविदा सूचना**

निविदा सूचना क्र.पमपा/बांधकाम/२४२१/प्र.क्र.०३/२४०५/२०२१ दिनांक : २७/१०/२०२१

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government / State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून जाहीर ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | PMC/CE/203/ 2021-22 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन पनवेल (पूर्व), भूखंड क्र. २८, सेक्टर-११ येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र (अकॅडमी) प्रशिक्षण देणे व चालविणे करीता प्रशिक्षण संस्थेची नेमणूक करणे. |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. २८/१०/२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त-II**
**पनवेल महानगरपालिका**



जा.क्र. न्याय शाखा/१३४६/२१
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरू इमारत, पोस्ट ऑफीसजवळ
अलिबाग, जि. रायगड
दिनांक : २७/१०/२०२१

**चौकशीची जाहीर नोटीस**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड**

अर्ज क्र:- १५/२०२१
निशाणी क्र.

**सार्वजनिक न्यासाचे नाव/नोंदणी क्रमांक :** गणपती देवस्थान शिवकर रजि. क्र. ए-११२९ रायगड, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड

**अर्जदार :** श्री. अणेश गणू ढवळे, राहणार-शिवकर, पोस्ट-चिखले, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.

सर्व संबंधितांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, मा. सहाय्यक धर्मदाय आयुक्त, रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेल्या अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५०-अ (१) प्रमाणे दाखल केलेल्या योजनेची खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**अ. जंगम मिळकतीचे वर्णन (परिशिष्ट १ प्रमाणे)**

| अ.क्र. | वस्तुचे नाव | नग | किंमत |
|---|---|---|---|
| १ | काशाचे टाळ जोडी | २० | रु. ४,०००/- |
| २ | मृदूंग | ०२ | रु. ३०००/- |
| ३ | प्रसादाची भांडी (ॲल्युमिनियम) | ०२ | रु. ५००/- |
| | **एकूण किंमत रुपये ७,५००/-** | | |

**ब. स्थावर मिळकतीचे वर्णन (परिशिस्ट-१ प्रमाणे)**

| अ.क्र | गावाचे नाव | स.न. व हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. | अंदाजे किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिवकर | २३३/० | ०-०४-१ | ०-०९ | १०,०००/- |
| २ | | ६९/० | २-५३-२ | १५-०० | १,००,०००/- |
| ३ | | १५/० | १-१९-० | ३-२५ | ५०,०००/- |
| ४ | | २६१/० | ०-५६-० | ४-४४ | २०,०००/- |
| ५ | | १८३/० | ६-७४-६ | ३३-८१ | २,००,०००/- |
| ६ | | १०/० | ०-०२-० | ०-०६ | देवस्थान असल्यामुळे किंमत करता येत नाही. |
| | | | | **एकूण किंमत** | **३,८०,०००/-** |

मौजे-शिवकर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड येथील वर नमुद तक्त्यातील अनु. क्र. ६ /गट क्र. १०/० क्षेत्र ०-०२-० हे.आर. या मिळकतीमध्ये देवाचे कौलारु मंदिर ग्रामपंचायत घर नं. २४६ हे देवस्थान आहे. सदर मंदीराच्या चर्तु:सिमा खालीलप्रमाणे :

पूर्वेस : गणेश मारुती भगत यांची भात शेती

पश्चिमेस : गणेश मारुती भगत यांची मोकळी मिळकत

दक्षिणेस : गणेश मारुती भगत यांची भात शेती

उत्तरेस : रामा पदू पाटील यांची मोकळी मिळकत

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणाला काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

येणेप्रमाणे ही चौकशीची जाहिर नोटीस माझे सहीनिशी व सहाय्यक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड शिक्यानिशी आज दिनांक २७/१०/२०२१ रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**(अंजली रमेश पिसाळ)**
अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग, रायगड


पान १ वरून

## मराठा आरक्षणासाठी लाँग मार्च काढणार -संभाजीराजे

या जनसंवाद यात्रेत पनवेलच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, मराठा समाज राज्य समन्वयक विनोद साबळे, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा नेते हॅप्पी सिंग, युवा मोर्चा कामोठे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, जिल्हा सरचिटणीस चिन्मय समेळ, पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाज बांधव-भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## महापालिका, नगर परिषदांमधील सदस्य संख्या वाढणार

महापालिकांमध्ये तीन लाखांपेक्षा अधिक व सहा लाखापर्यंत लोकसंख्येसाठी निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या ७६ व अधिकतम संख्या ९६पेक्षा अधिक नसेल. सहा लाखांपेक्षा अधिक व १२ लाखांपर्यंत लोकसंख्येसाठी निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या ९६ व अधिकतम संख्या १२६पेक्षा अधिक नसेल. १२ लाखांपेक्षा अधिक व १४ लाखांपर्यंत लोकसंख्येसाठी निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या १२६ व अधिकतम संख्या १५६पेक्षा अधिक नसेल. २४ लाखांपेक्षा अधिक व ३० लाखांपर्यंत लोकसंख्येसाठी निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या १५६ व अधिकतम संख्या १६८पेक्षा अधिक नसेल आणि ३० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्येसाठी निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या १६८ व अधिकत्तम संख्या १८५ पेक्षा अधिक नसेल.

अ वर्ग नगर परिषदांमध्ये निवडून आलेल्या परिषद सदस्यांची किमान संख्या ४० व अधिक संख्या ७५हून अधिक नसेल. ब वर्ग नगर परिषदांमध्ये निवडून आलेल्या परिषद सदस्यांची किमान संख्या २५ व अधिक संख्या ३७हून अधिक नसेल, तर क वर्ग नगर परिषदांमध्ये निवडून आलेल्या परिषद सदस्यांची किमान संख्या २० व अधिक संख्या २५हून अधिक नसेल.

## नावड्यात नेत्रतपासणी शिबिर, मोफत चष्मे वाटप

या वेळी ५५०हून अधिक नागरिकांची नेत्रतपासणी करण्यात आली तसेच सुमारे ४००पेक्षा जास्त नागरिकांना चष्म्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

या उपक्रमाला सचिन लक्ष्मणशेठ पाटील, नारायण जोमा म्हात्रे, विष्णू जोमा म्हात्रे, शैलेश लक्ष्मणशेठ म्हात्रे, संतोष विष्णू म्हात्रे, रमेश विष्णू म्हात्रे, एकनाथ म्हात्रे, कुणाल अविनाश म्हात्रे, अनंता रामदास म्हात्रे, राजेश खानावाकर, प्रशांत म्हात्रे, पंकज म्हात्रे, धीरज म्हात्रे, अरुण गवळी, निलेश म्हात्रे, राजेश म्हात्रे, भालचंद्र खानावकर, मदन खानावकर, रवींद्र खानावकर, राम खानावकर, लक्ष्मण खानावकर, यशवंत ठाकूर, विनोद खानावकर, विशाल खानावकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, लक्ष्मणशेठ पाटील यांनी समाजाच्या दृष्टिकोनातून आपल्याला जे जे देता येईल याचा प्रयत्न सातत्याने केला. लक्ष्मणशेठ पाटील व अविनाश यांच्या निधनाने दुःखातून बाहेर येत त्यांच्या परिवारातील सदस्यांनी त्यांचे अनुकरण करीत समाजासाठी आपण काही केले पाहिजे या भावनेतून आरोग्यदायी उपक्रमाचे आयोजन करणे कौतुकास्पद आहे. लक्ष्मणशेठ पाटील यांची समाजासाठी काम करण्याची जी तळमळ होती तीच त्यांची पुढील पिढी तितक्याच समर्थपणाने चालवेल, असाही विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.


**जाहीर नोटीस**

आम्ही मिस्त्री कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा. लि. खालील नमुद केल्याप्रमाणे प्रकल्प चालू करत आहोत. प्रकल्पाची माहिती खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| OWNER/DEVELOPER | MISTRY CONSTRUCTION CO. PVT. LTD. 337, CHANDAVARKAR ROAD, MATUNGA (CR) MUMBAI 400 019 PHONE : 022-24104085 / 86 / 87 FAX: 022-24104084 E-MAIL: MISTRY_CONSTRUCTION@REDIFFMAIL.COM |
| PLOT DETAIL | POCKET D & E, SECTOR-60, NERUL, NAVI MUMBAI PLOT BOUNDARY DESCRIPTION: NORTH-15 MTS. WIDE ROAD SOUTH - SECTOR-54 EAST - SEAWOODS COMPLEX WEST - POCKET B & C |
| GRANT OF DVELOPMENT PERMISSION DETAILS | CIDCO/BP-15516/TPO (NM & K) /2017/8159 DATED - 05 FEBRUARY 2021 |
| ARCHITECT | DIMENSIONS ARCHITECTS PVT. LTD. PLOT NO. 99, NEAR SAGAR VIHAR, SECTOR-08, VASHI, NAVI MUMBAI.400 703 |
| STRUCTURAL CONSULTANT | STRUCTCON ENGINEERS 502, 5TH FLOOR, THACKER TOWER, SECTOR-17, VASHI, NAVI MUMBAI. 400 705 |
| CONTRACTOR | J.M. MHATRE INFRA PVT. LTD PLOT NO: 492. MARKET YARD. SAHAKAR NAGAR. PANVEL-PIN 410206 NAVI MUMBAI |
| ESTIMATED COMPLETION DATE | 30/06/2026 |
| NUMBER OF UNIT | RESIDENTIAL - 277 COMMERCIAL - 13 |
| ADDRESS FOR COPIES OF DETAILED APPROVED PLAN FOR INSPECTION | MISTRY CONSTRUCTION CO. PVT. LTD. 337, CHANDAVARKAR ROAD, MATUNGA (CR), MUMBAI 400 019 PHONE : 022-24104085 / 86 / 87 FAX : 022-24104084 E-MAIL: MISTRY_CONSTRUCTION@REDIFFMAIL.COM |

ठिकाण : नेरूळ
दिनांक : २८/१०/२०२१

मिस्त्री कन्स्ट्रक्शन कंपनी
प्रा. लि. करिता

# आता संपूर्ण लसीकरणासाठी नियोजन

## ■ नवी मुंबई मनपाचे १०० टक्के नागरिकांना दुसरी मात्रा देण्याकडे लक्ष

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरातील १०० टक्के नागरिकांना पहिली मात्रा देणारी नवी मुंबई ही एमएमआर क्षेत्रातील पहिली महापालिका ठरली आहे. त्यामुळे महापालिकेने १०० टक्के नागरिकांना दुसरी मात्रा देण्याकडे आपले लक्ष केंद्रित केले आहे. यासाठी महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या नेतृत्वाखाली नियोजनबद्ध आराखडा तयार करण्यात आला आहे.



नागरी आरोग्य केंद्रांकडे उपलब्ध असलेल्या दैनंदिन लसीकरणाच्या यादीनुसार ८४ दिवस आधी कोविशिल्ड तसेच २८ दिवस आधी कोवॅक्सिन लसीची पहिली मात्रा घेणाऱ्या व्यक्तींना दुसरी मात्रा घेण्याचा विहित कालावधी पूर्ण झाल्याचे सांगितले जाणार आहे. यासाठी महानगरपालिकेच्या कोरोना कॉल सेंटरकडे पहिली मात्रा झालेल्या नागरिकांची यादी देण्यात आली असून कॉल सेंटरमार्फतही नागरिकांना सूचना करण्यात येणार आहे. दिवसाला १० हजार नागरिकांना दूरध्वनी करून दुसरी मात्रा घेण्यासाठी आवाहन केले जाणार आहे.

आत्तापर्यंत नवी मुंबई महानगरपालिकेची लसीकरण केंद्रे व खासगी रुग्णालये याठिकाणी ११ लाख १७ हजार ६८५ नागरिकांनी कोरोना लशीची पहिली मात्रा घेतली. पाच लाख ९७ हजार ६५३ नागरिकांनी दुसरी मात्रा घेतली. नागरिकांनी दुसरी मात्रा घेण्याचा कालावधी पूर्ण झाला की, लगेच ती घ्यावी, असे आवाहन वेगवगेळ्या माध्यमांतून पालिका करत आहे. आता शहरातील रुग्णसंख्या कमी होत चालली असली, तरी तिसरी लाट येण्याचा धोका आहे. हा धोका टाळायचा असेल तर लसीकरणाला महत्त्व द्यावेच लागेल. त्यामुळे नवी मुंबईला लस संरक्षित करण्याकडे पालिकेने लक्ष केंद्रित केले आहे.

### दुसऱ्या डोससाठी पालिकेचे आवाहन

*नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने दैनंदिन लसीकरणाचे सुयोग्य नियोजन केले जात असून दुसऱ्या दिवशीच्या लसीकरणाची माहिती आदल्या दिवशी संध्याकाळी व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम अशा सोशल माध्यमांवरून तसेच nmmccovidcare.com या पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्यामुळे नवी मुंबईकरांनी पहिली मात्रा घेऊन ठरलेला कालावधी पूर्ण झाल्यावर लगेच नजीकच्या महानगरपालिका लसीकरण केंद्रावर जाऊन दुसरी मात्रा घ्यावी व संपूर्ण लस संरक्षित व्हावे. जरी खासगी रुग्णालयात पहिली मात्रा घेतली असली, तरी दुसरी मात्रा पालिकेच्या कोणत्याही लसीकरण केंद्रावर विनामूल्य उपलब्ध आहे, असे पालिकेकडून सांगण्यात आले.*

## निवडक

### कंटनेरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** उलवे येथून बेलापूरच्या दिशेने जाणाऱ्या मोटरसायकल चालकास पाठीमागून येणाऱ्या कंटेनर चालकाने धडक दिली. झालेल्या अपघातात मोटरसायकल चालकाचा मृत्यू झाल्याची घटना तरघर येथील उड्डाणपुलावर घडली. या अपघातानंतर एनआरआय पोलिसांनी कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल करुन त्याला ताब्यात घेतले आहे. या अपघातात मृत झालेल्या मोटरसायकल चालकाचे नाव सुभाषचंद्र यादव (वय ३६, रा. उलवे) असे आहे. सुभाषचंद्र हा बजाज डिस्कवर मोटरसायकलवरून बेलापुरच्या दिशेने जाताना तरघर येथील उड्डाणपुलावर आला. या वेळी पाठीमागून कंटेनरने त्याला धडक दिली. या अपघातात सुभाषचंद्र याचा जागीच मृत झाला. या अपघातानंतर एनआरआय पोलिसांनी कंटेनर चालक राजकुमार गुप्ता याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

### तळोजात ज्वेलर्स दुकानात चोरी

**पनवेल :** तळोजा परिसरातील एका ज्वेलर्स दुकानातून सोने खरेदीच्या नावाने तीस हजार रुपयांचा ऐवजाची दिवसाढवळ्या चोरी झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी या चोरट्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आर.सी.गोल्डचे मालक पियुष जयंतीलाल सोनी (रा.तळोजा फेज १) यांच्या मालकीचे आर.सी.गोल्ड हे सोन्याचे दुकान सेक्टर-१४ तळोजा फेज १ येथे आहे. पियुष दुकानात असताना एक व्यक्ती दुकानात आला. त्याने सुरुवातीला सोन्याची चैन घेयाची आहे असे संगितले, त्यानंतर अंगठी दाखविण्यास सांगितले. या वेळी चोरट्याने हात चालाखीने दोन अंगठ्या (किंमत ३२ हजार रुपये) लंपास केल्या. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पियुष यांनी तळोजा पोलिसांत तक्रार दिली. त्यानुसार गुन्हा दाखल करून पोलीस चोरट्याच्या शोध घेत आहेत.

### फेसबुकद्वारे मैत्री करून महिलेस गंडा

**पनवेल :** फेसबुकवरुन मैत्री करून खात्यामध्ये सहा लाख ६९ हजार जमा करा, असे सांगून एका महिलेची फसवणूक केल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. नवीन पनवेलमध्ये राहणाऱ्या एका महिलेची टॉनी माईक नावाच्या व्यक्तीशी फेसबुकवरून मैत्री झाली. टॉनी माईकने महिलेचा मोबाइल क्रमांक घेऊन तो इंग्लड येथे राहत असल्याचे खोटे सांगून तीन लाख रुपये व सोन्याच्या बांगड्या, अंगठी, लॅपटॉप, पर्स, कपडे आहेत. ते पार्सल दिल्ली येथे अडकले आहे, असे सांगून त्याकरिता खात्यामध्ये सहा लाख ६९ हजार जमा करण्यास सांगितले. महिलेकडून वेगवेगळ्या खाते क्रमांकामध्ये पैसे वळते करून घेऊन त्यांच्या रक्कमेचा अपहार केल्याने याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### भरत सांगोलकर यांचा सत्कार



**पनवेल :** शहरातील जनकल्याण नागरी सहकारी बँकेचे शाखाधिकारी भरत सांगोलकर यांची ठाणे शाखा येथे बदली झाल्याने प्रभागातील नगरसेविका रूचिता लोंढे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी शाखाधिकारी महेश कांबळे, पत्रकार संजय कदम, उद्योजक राजेंद्र बोहरा, इंदरसिंग चुडावत, घेवर चौधरी, महेंद्र राजपुरोहित आदी उपस्थित होते. व्यापारी बंधू व खातेदारांनी सांगोलकर यांना शुभेच्छा दिल्या.

### मृत महिलेच्या कुटुंबीयांकडून आवाहन

**पनवेल :** पनवेल-शीव महामार्गावर १० दिवसांपूर्वी झालेल्या अपघातात रेनू चौधरी या महिलेचा मृत्यू झाला, मात्र अपघातस्थळी सीसीटीव्ही नसल्याने या अपघाताची उकल अद्याप झाली नाही. त्यामुळे मृत महिलेच्या कुटुंबीयांनी शहरात फलक लावत या अपघाताबाबत माहिती देण्याचे आवाहन केले आहे. १५ ऑक्टोबर रोजी ठाणा नाका येथे रेणू चौधरी (रा. कामोठे वसाहती) या जखमी अवस्थेत आढळल्या होत्या. ठाणा नाका ते खांदेश्वर उड्डाणपूलदरम्यान हा अपघात झाला होता. दसऱ्याच्या दिवशी त्या पनवेलमध्ये कामानिमित्त आल्या होत्या. पनवेल शहर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली, मात्र अपघात नेमका कसा व कोणाकडून झाला याची माहिती मिळू शकली नाही. त्यामुळे तिच्या भावांनी शहरात फलक लावले असून नागरिकांना व प्रवाशांना या अपघाताबाबत काही माहिती असल्यास कळविण्याची विनंती केली आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येणार आहे.



## खांदा कॉलनीत खासदार संभाजीराजेंची जनसंवाद यात्रा

**पनवेल : वार्ताहर**

मराठा क्रांती मोर्चा-रायगड तर्फे आयोजित खासदार संभाजीराजे यांची जनसंवाद यात्रा खांदा कॉलनी येथे मंगळवारी आली होती. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.

या वेळी खांदा कॉलनीच्या मराठा समाज बांधवानी डोक्यावर घातलेले भगवे फेटे व शिस्तबद्ध नियोजन याचे राजेंनी विशेष कौतुक केले. सकल मराठा समाज खांदा कॉलनीच्या आरक्षण लढ्याच्या चळवळीतील सहभागाबाबत खांदा कॉलनीच्या समाज बांधवांचा खांदा लागल्याशिवाय हा आरक्षणाचा लढा अपूर्ण असल्याचे सांगितले.


या दौऱ्यावेळी सकल मराठा समाज खांदा कॉलनी व मराठा उद्योजक सारथीच्या लोगोचे अनावरण राजेंच्या हस्ते झाले. या वेळी रायगड जिल्हा समन्वयक व खांदा कॉलनीतील मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## राष्ट्रवादीच्या मेळाव्याने पर्यावरणाचे नुकसान

### वाशीमध्ये चक्क झाडांवर खिळे ठोकून फलकबाजी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशीतील नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन (एनएमएसए) येथे राष्ट्रवादी काँग्रेसने आयोजित केलेल्या परिवारसंवाद मेळाव्याच्या निमित्ताने या परिसराचे विद्रूपीकरण आणि पर्यावरणाचे नुकसान झाल्याचे दिसून आले.



राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या मेळाव्यासाठी वाशी सेक्टर ४, ६, ७, ८, ९ परिसरात सोमवारी फलकबाजीला ऊत आला होता. फलक लावण्यासाठी अनेक ठिकाणी झाडांच्या बुंध्यांना खिळे ठोकण्यात आले होते तर, अनेक ठिकाणी दिशादर्शक फलकांच्या खांबांना फलक लावण्यात आले होते.

सुशिक्षित, उच्चभ्रूंचा परिसर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या परिसराच्या विद्रूपीकरणाबद्दल तसेच झाडांना इजा करण्याच्या प्रयत्नांबद्दल येथील नागरिकांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. तसेच असंख्य नागरिकांनी राष्ट्रवादीच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांसह पक्षातील ज्येष्ठ नेते जितेंद्र आव्हाड आणि आनंद परांजपे यांच्याकडेही लघुसंदेशाद्वारे याबाबत आक्षेप नोंदवल्याचे समजते.

राष्ट्रवादीच्या परिवार संवाद मेळाव्यासाठी कार्यकर्त्यांनीही नेत्यांच्या स्वागतासाठी फलक लावले होते. त्यामुळे सोमवारी या परिसराला अवकळा आली होती. याबद्दल सामाजिक कार्यकर्ते संदीप ठाकूर यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. झाडांना खिळे ठोकून फलक लावणे चुकीचे असून वृक्ष प्राधिकरणाने याबाबत कारवाई करण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

**कारवाईची मागणी**

फलकबाजीबद्दल स्थानिक नागरिकांतून तीव्र प्रतिक्रिया उमटल्यामुळे कार्यक्रम आटोपताच हे फलक तातडीने हटवण्यात आले, मात्र महापालिकेने आधीच या विद्रूपीकरणावर कारवाई करण्याची गरज होती, असे मत काही नागरिकांनी व्यक्त केले.

## दिशा महिला मंचतर्फे संकल्प नेत्रदानाचा उपक्रम

**कामोठे : वार्ताहर**

दिशा महिला मंच आयोजित लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सहकार्याने रविवारी (दि. २४) कामोठेतील श्रद्धा अकॅडमी येथे 'संकल्प नेत्रदानाचा' उपक्रम आयोजित केला होता. या वेळी १०५ नेतत्रदात्यांनी मारणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केला. त्यासाठी रीतसर ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज भरून सर्व फॉर्मेलिटी पूर्ण केल्या.



उपस्थितांना डॉ. तन्वी खोसला यांनी नेत्रदानाचे महत्त्व व गरज यावर योग्य मार्गदर्शन केले, तसेच डॉ. वैशाली जवादे यांनी नेत्रदान व देहदान कुठे व कसे करावे यासंदर्भात मार्गदर्शन केले. रंजना सडोलीकर यांनी उपक्रमाचे कौतुक करीत जास्तीत जास्त लोकांनी नेत्रदान करावे या संदर्भात मार्गदर्शन केले.

खूप दिवसापूर्वी नेत्रदान करावे असा विचार फक्त मनात घोळत होता, पण आज दिशा व्यासपीठमार्फत तो संकल्प पूर्ण झाला याचा आनंद नेत्रदात्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता आणि याचे मनोमन समाधान वाटते, असे व्यासपीठच्या संस्थापक अध्यक्ष निलम आंधळे यांनी सांगितले. या उपक्रमाला कामोठे कॉलनी फोरमचे अध्यक्ष मंगेश आढाव, निरव नंदोला, प्रशांत कुंभार, अमित गुट्टकडे, राहुल शिंदे, संगीता राऊत, जयश्री झा उपस्थित होते. संस्थापक निलम आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली खुशी सावर्डेकर, मनीषा कोचळे यांच्या सहकार्याने हा उपक्रम कामोठे येथे यशस्वीरीत्या झाला.

## पथदिव्यांची तत्काळ दुरुस्ती करा

### भाजप नेते पांडुरंग आमले यांची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा प्रभाग ७६ मधील सेक्टर २, ३, ४ व ८ या परिसरात पथदिव्यांची समस्या गंभीर असून रहिवाशांना अंधारात ये-जा करावी लागत आहे. अनेक भागात पथदिवे बंद आहेत, तर काही ठिकाणी पथदिव्यांची दुरावस्था झाली असल्याने नवी मुंबई मनपाने पथदिवे त्वरित दुरुस्त करावेत, अशी मागणी भाजपचे नेते पांडुरंग आमले यांनी मनपाकडे केली आहे.

सानपाडा सेक्टर ८ मधील कोहीनूर सोसायटीच्या जवळील पथदिव्याचा बल्ब असलेला बॉक्स अडीच महिन्यांपूर्वी पावसाळ्यात वाऱ्यामुळे पडला असून तो आजतागायत बंदच आहे. या पथदिव्याच्या दुरुस्तीबाबत अडीच महिन्यांत पालिका प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. प्रभागात अंधारामुळे वाटमारी, लुटमार, छेडछाड व विनयभंग अथवा अन्य काही दुर्घटना घडण्याची भीती आहे. या प्रभाग ७६ मधील रहिवाशांच्या समस्या सोडविण्यासाठी संबंधितांना पथदिव्यांच्या दुरूस्तीचे आदेश देवून स्थानिक रहीवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी पांडूरंग आमले यांनी महापालिका आयुक्तांकडे दिलेल्या निवेदनात केली आहे.

## वीर वाजेकर कॉलेजमध्ये विधी साक्षरता अभियान

**उरण : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण येथील वीर वाजेकर एएससी कॉलेड फुंडे राज्यशास्त्र विभाग आणि उरण न्यायालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विधी साक्षरता अभियान झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख दिवाणी न्यायाधीश एन. एम. वाली हे होते.

या वेळी तज्ज्ञ मार्गदर्शक अ‍ॅड. पराग म्हात्रे, अ‍ॅड. किशोर ठाकूर, अ‍ॅड. धीरज डाकी, अ‍ॅड. अमर पाटील यांनी रॅगिंगसंबंधी कायदे, महिलांवरील आत्याचार इत्यादी विषयांवर मार्गदर्शन केले. सह दिवाणी न्यायाधीश आर. व्ही. पोळ तसेच पी. एन. पठारे यांची विशेष उपस्थिती होती. प्रभारी प्राचार्य डॉ. सि. बी. ओटील यांनी पाहूण्यांचे स्वागत तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संदीप घोडके यांनी प्रास्ताविक व परिचय करून दिला.

## कोकण भवनमध्ये दक्षता जनजागृती सप्ताहाचा प्रारंभ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

जीवनाच्या सर्व क्षेत्रात सच्चेपणा आणि कायद्याचे पालन करेन. लाच घेणार नाही आणि लाच देणार नाही. सर्व कामे प्रामाणिकपणे आणि पारदर्शक पद्धतीने करेन. जनहितासाठी कार्य करेन, अशी प्रतिज्ञा घेऊन भ्रष्टाचाराविरुद्ध जनजागृती करण्याच्या उद्देशाने मंगळवारी (दि. २६) कोकण भवनमध्ये दक्षता जनजागृती सप्ताहाचा प्रारंभ करण्यात आला.

दरवर्षी २६ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला जातो. सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा आणि सत्यनिष्ठा याबद्दलच्या दृढनिश्चयाचे बळकटीकरण करण्यासाठी नागरिकांच्या सहभागाने हा सप्ताह साजरा करण्यात येतो. या वर्षी हा सप्ताह केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. सप्ताहाचे बोधवाक्य 'स्वतंत्र भारत-७५ : सचोटीतून आत्मनिर्भरतेकडे' असे आहे.

विभागाच्या भ्रष्टाचार निर्मूलन मोहिमेत नागरिकांनी देखील सहभागी होऊन, लाचेची मागणी करणाऱ्यांची माहिती विभागाला द्यावी, असे आवाहन नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

कोकण भवनमधील बैठक सभागृहात उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांनी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांबरोबर भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेतली. या वेळी उपायुक्त (महसूल) मकरंद देशमुख, उपायुक्त (पुरवठा) विवेक गायकवाड, उपायुक्त (विकास) गिरीश भालेराव, उपायुक्त (नगरपालिका) रवींद्र जाधव हे उपस्थित होते.

## दिवाळी खरेदीसाठी उत्साह; आकर्षक कंदिलांनी बाजारपेठा सजल्या

**पनवेल, उरण : वार्ताहर**

दिवाळी म्हटली की आकाश कंदिलाच्या प्रकाशाने अवघे घर उजळून निघते व मांगल्याचे वातावरण तयार होते. या सणाला अवघे मोजकेच दिवस उरले असल्याने पनवेल व उरणमधील बाजारपेठा रंगीबेरंगी आकाश कंदिलांनी प्रकाशमय झाल्या आहेत. यंदाची दिवाळी उत्साहात साजरी होणार असून, दिवाळीपूर्वीच्या खरेदीसाठी बाजारपेठा गजबजू लागल्या आहेत, तसेच दुकानांमध्ये लावण्यात आलेले वेगवेगळ्या आकारातील आकाश कंदिल ग्राहकांचे लक्ष वेधून घेत असून, खरेदीसाठी गर्दी होत आहे.



कोरोना विषाणूच्या सावटामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून मागील वर्षी दिवळी सणांवर निर्बंध आणले होते, मात्र यंदाच्या वर्षी दिवाळी मोकळ्या वातावरणात साजरी होणार आहे. त्यामुळे दिवाळीपूर्वीच्या खरेदीसाठी नागरिक बाहेर पडू लागले आहेत, तसेच बाजारपेठाही दिवाळी सणासाठी सज्ज झाल्या असून, विविध प्रकारच्या आकाश कंदिलांनी बाजारपेठा गजबजल्या आहेत. दिवाळीत आकाश कंदिलांचे सर्वांनाच आकर्षण असते. घराच्या छतावर पडवीत कंदिल लावले जातात.

दिवाळीनिमित्त बाजारात यंदा विविध आकार आणि प्रकारातील कंदिल उपलब्ध झाले आहेत. यंदा बाजारात वेगवेगळ्या आकारातील आकर्षक आकाश कंदिल दाखल झाले आहेत. यामध्ये घुमट, त्रिकोणी, चौकोनी, चांदणी, लंबाकूठी, गोलाकार, पॅरेशूट हंडी या आकारातील कंदिल कापड, स्पंज, कागद, बांबूच्या काड्या, लाकूड यापासून बनविलेले कंदिलांचा समावेश आहे. यामध्ये ग्राहक स्वदेशी बनावटीच्या कंदिलाची सर्वाधिक पसंती देत आहेत. हे आकाश कंदिल ५० रुपयांपासून ते एक हजार रुपयांपर्यंत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. काही ठिकाणी स्थानिक कारागिर कंदिल बनवून त्यांची विक्री करत असून, त्यांनाही ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. यंदा कंदिलाच्या दरात १० ते १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. कोरोनाचा प्रभाव कमी झाला असल्याने दिवाळी खरेदीसाठी बाजारात उत्साह दिसत आहे. त्यामुळे दिवाळीपूर्व खरेदीसाठी बाजारात गर्दी दिसत आहे.

> **उरण बाजार पेठेत गांधी चौक, राजपाल नाका, सेंट मेरीज हायस्कूल जवळ आदी ठिकाणी कंदील विक्री केली जाते. कंदील १० रुपयांपासून दोन हजार रुपये किमतींपर्यंत विक्रीस आहेत.**
> **-संजय म्हात्रे, कंदील विक्रेते**

## संपादकीय

# ‘जलयुक्त’ पारदर्शकच

राजकारणामध्ये कोणीही कितीही वारेमाप आरोप केले, तरी अखेर सत्याचाच विजय होतो. खोटे बोल पण रेटून बोल, या गोबेल्स नीतीचा काही काळापुरता फायदा उचलता येतो, परंतु अंतिमत: असत्याचा पराभव ठरलेला असतो. वारंवार सांगितल्यामुळे खोट्याचे खरे कधी होत नसते किंवा खऱ्याचे खोटेदेखील होत नाही. जलयुक्त शिवार योजना ही याचे उत्तम उदाहरण आहे.

**माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कारकीर्दीत जलयुक्त शिवार योजनेला प्रारंभ झाला होता. या महत्त्वाकांक्षी योजनेने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आयुष्यात आमुलाग्र बदल घडवून आणला. सततच्या दुष्काळामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना जलयुक्त शिवार योजनेमुळे अक्षरश: जीवनदान मिळाले, परंतु दोनएक वर्षांपूर्वी महाविकास आघाडीने जनमत धुडकावून मागल्या दाराने सत्तेची खुर्ची बळकावली आणि मग सुरू झाला एका निर्नायकी अराजकाचा कारभार. सत्तेवर आल्यानंतर महाविकास आघाडी सरकारच्या मंत्र्यांवर लागोपाठ भ्रष्टाचाराचे आणि अनिर्बंध गैरवर्तनाचे आरोप पुराव्यांसकट होऊ लागले. त्यामुळे सत्ताधाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. विशेषत: विरोधीपक्ष नेत्याच्या भूमिकेत आल्यावर देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडी सरकारच्या नेत्यांना सळो की पळो करून सोडले. अशा परिस्थितीमध्ये आधीच्या सरकारवर काही तरी बालंट आणण्याची गरज सत्ताधाऱ्यांना वाटू लागली. हे नि:संशय सुडाचेच राजकारण होते व आहे. सत्ता मिळाल्यानंतर सगळेच्या सगळे सरकारी दफ्तर उलटेपालटे करूनही गैरकारभाराचा कुठलाही तुकडा न गवसल्यामुळे आधीच्या फडणवीस सरकारला कुठल्या प्रकरणात गोवायचे असा प्रश्न निर्माण झाला. त्यातूनच जलयुक्त शिवार योजनेमध्ये प्रचंड घोटाळा झाल्याची आवई उठवण्यात आली. हा शुद्ध कांगावा होता हे वेगळे सांगायला नकोच. जलयुक्त शिवार योजनेमधील अनियमितता आणि एकंदरीत अपयश याचा हिशेब मांडण्यासाठी महाविकास आघाडी सरकारने स्वतंत्र समिती नेमून चौकशीस प्रारंभ केला. या समितीने आता जलयुक्त शिवार योजनेला क्लीनचिट दिली आहे. महाविकास आघाडी सरकारच्याच जलसंधारण विभागाने हा अहवाल दिला असून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे कल्याण साधणाऱ्या या योजनेत कुठलाही गैरव्यवहार झाला नसल्याचा निर्वाळा दिला आहे. जलयुक्तवर कॅगने काही ताशेरे ओढले होते. त्या ताशेऱ्यांचे खंडनदेखील या अहवालात करण्यात आले आहे. या संदर्भातील फडणवीस यांची प्रतिक्रिया अतिशय प्रगल्भ म्हणायला हवी. ते म्हणाले की, मला अतिशय आनंद होतो आहे कारण ही जनतेची जनतेने राबवलेली योजना आहे. उच्च न्यायालयाद्वारे स्थापित देशभरातील तज्ज्ञांच्या समितीने सुद्धा हीच बाब सांगितली होती. त्यामुळे संपूर्ण योजनेला बदनाम करणे चुकीचेच होते. फडणवीस यांच्या प्रतिक्रियेनंतर महाविकास आघाडी सरकारला जणु खडबडून जाग आली आणि कुठल्याही प्रकारची क्लीन चिट जलयुक्त शिवार योजनेला अद्याप मिळाली नसल्याचे जलसंधारण सचिवांनी घाईघाईने जाहीर केले. मृदा व जलसंधारण विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी लोकलेखा समितीसमोर २६ ऑक्टोबर रोजी साक्ष दिली. त्यात ही आकडेवारी देण्यात आली असल्याचा खुलासा जलसंधारण सचिवांनी केला. कॅगने उपस्थित केलेल्या मुद्यांवर अपर मुख्य सचिवांची साक्ष नोंदवली गेली असल्याचे समजते. काहीही असले तरी जलयुक्त शिवार योजनेला बदनाम करण्याचा महाविकास आघाडीचा डाव सपशेल तोंडघशी पडला आहे एवढे तरी यातून सिद्ध झाले. एखाद्या चांगल्या योजनेला कितीही वाईट ठरवले तरी उपयोग होत नाही, कारण चांगल्या योजनेची फळे नागरिकांनी चाखलेलीच असतात.**

# केवनाळे, साखर सुतारवाडी पुनर्वसनाचा पेच?



अतिवृष्टीमुळे पोलादपूर तालुक्यात २२ जुलै २०२१ रोजी भूस्खलन होऊन साखर आणि सुतारवाडी येथे वित्त व मनुष्यहानी झाली होती. तेथील पुर्णत: बाधितांचे पुनर्वसन आणि संभाव्य बाधित क्षेत्रातील नागरिकांचे पुनर्वसन, पुनर्वसनासाठी भुसंपादन, संपादित जमिनीचे मोजमाप तसेच मोबदले याखेरिज केवनाळे येथील नियोजित दोन जमिनींची परस्परजोडणी आदी विविध समस्यांबाबत पेच निर्माण झाले आहेत. या कामांची पूर्तता तसेच पुनर्वसन कामाची जबाबदारी पार पाडण्यासंदर्भात प्रशासनाकडून अक्षम्य हलगर्जीपणा होत असल्याचा लाभ राजकीय प्रभाव वाढविण्यासाठी केला जाणार आहे. दरम्यान साखर सुतारवाडी येथे टाटा समुहाकडून तर कोटक महिंद्रा समुहाकडून दरडग्रस्त केवनाळे गावाचे पुनर्वसन केले जाणार आहे.

**पुनर्वसनासाठी दोन प्रकारचे बाधित**

साखर सुतारवाडी आणि केवनाळे येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन करताना पुर्णत: घरे गमावलेल्यांच्या पुनर्वसनासोबतच जी घरे दरडप्रवण क्षेत्रामध्ये आहेत मात्र, बाधित झाली नाहीत अशांचेही पुनर्वसन करण्यात येणार आहे. याखेरिज, दोन्ही प्रकारच्या बाधितांच्या घरांचे अ,ब,क अशा प्रकारच्या घरपट्ट्यांचे उतारे करण्यात येऊन घरांची संख्यादेखील वाढविली जाणार आहे. यामुळे मूळ पुर्णत: घरे गमावलेल्यांच्या पुनर्वसनाला विनाकारण खीळ बसणार असून आगामी काळामध्ये बाधितांना कन्टेनर केबिनच्या घरांमध्ये राहावे लागणार आहे. याच काळात उर्वरित बाधितांना त्यांच्या स्वत:च्या घरांमध्ये राहण्याची मुभा मिळणार आहे.

**केवनाळे बाधितांसाठी जमिनीची तरतूद**

देवळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील गावठाण जमिनीऐवजी केवनाळे येथे सध्या कंटेनर निवासी संकुलाजवळील खासगी जमीन खरेदीसाठी प्रस्तावित करून केवनाळेतील बाधितांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न महसुल यंत्रणांकडून होणार आहे. या जमिनीच्या मध्यभागी दरीसदृश्य खोल भाग असल्याने येथील दोन्ही जमिनी जोडण्यासाठी पुल उभारावा लागणार आहे. शासनाकडून या पुलासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. या पुलाखेरिज भुसंपादन, मोजणी व घरांची संख्यानिश्चिती यासारखे अनेक महत्वाचे निर्णय प्रलंबित आहेत. पुनर्वसनासाठी पुढाकार घेणाऱ्या कोटक महिंद्रा फायनान्स कंपनीच्या सीआरएस फंडाचा वापर करून या सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी मोठ्या प्रमाणात विलंब होत आहे.

**केवळ मृत्यू झालेल्या दरडग्रस्त गावांचे पुनर्वसन?**

पोलादपूर तालुक्यातील अनेक गावांना २२ जुलै २०२१ च्या अतिवृष्टीदरम्यान दरडबाधित व्हावे लागले आहे. याखेरिज, ज्या गावांचे रस्ते, पुल, शेती, व्यापार, व्यवसाय तसेच खासगी आणि शासकीय इमारतींचे नुकसान झाले आहे, अशांनाही पुरेशी भरपाई मिळालेली नाही. यामुळे सर्व आपद्क्षेत्र अद्याप उद्ध्वस्त अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे. अशा परिस्थितीत केवळ मृत्यूमुखी पडलेल्या साखर सुतारवाडी आणि केवनाळे या गावांच्याच पुनर्वसनाचा सातत्याने उल्लेख होत आहे. दाभिळ आदिवासीवाडीच्या अलिकडे व पलिकडेही दरडी कोसळल्या होत्या. तेथील महादेव कोळी समाजाच्या लोकांनीदेखील पुनर्वसनाची मागणी केली आहे, मात्र त्याकडे दूर्लक्ष केले गेले आहे.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

दरडग्रस्त केवनाळे आणि चिरेखिंड परिसरातील आंबेमाची गावाच्या पुनर्वसनाचा अनाकलनीय सूर अनेकांनी सहेतूकरित्या आळविला आणि कालांतराने तो हवेत विरला. आंबेमाची ग्रामस्थांनी स्थलांतरास लेखी विरोधही दर्शविला. या पार्श्वभुमीवर केवळ मृत्यू झालेल्या दरडग्रस्त क्षेत्रातील बाधित आणि संभाव्य दरडप्रवण क्षेत्रातील घरांचे पुनर्वसन करण्याची भूमिका शासनाकडून घेतली जात आहे.

**जमिनीचे दर आणि क्षेत्र निश्चितीसाठी सहकार**

केवनाळे गावाच्या पुनर्वसनासाठी अवाजवी दर मागून जमिनीची निश्चिती करण्याचा प्रकार उघडकीस आला असून प्रशासनावर याबाबत अपरिहार्यतेचे दडपणही दिसून आले आहे. सोयीस्कर जमिनी संपादित करण्याऐवजी केवळ सुचविलेल्या जमिनींच्या भौगोलिक स्वरूपाकडे दूर्लक्ष करून बाधित तसेच संभाव्य बाधितांचे स्थलांतर करून पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केवनाळे आणि साखर सुतारवाडीच्या पुनर्वसनावेळी होणार आहे. यादरम्यान, क्षेत्र निश्चितीसाठी सोबत राहणाऱ्या राजकीय व्यक्तींचा सशर्त सहकार प्रशासनासमोर आव्हान बनले आहे. बाधितांच्या पुनर्वसनासाठी आग्रही असलेले स्थानिक राजकीय पुढारी सशर्त सहकार करताना दबावतंत्र राबवित असल्याने प्रशासनाची डोकेदुखी ठरत आहेत.

**आगामी निवडणुककामी व्यस्त राहणार यंत्रणा**

येत्या महिनाभरात पोलादपूर नगरपंचायतीची निवडणूक जाहीर होणार असून तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समितीच्या चार जागांसाठी मार्च २०२२ पूर्वी निवडणुका होऊ घातल्या जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर महसूल प्रशासनासह तालुक्यातील सर्वच सरकारी यंत्रणा निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी व्यस्त झाल्या आहेत. त्यामुळे केवनाळे पुनर्वसन कामात पुढाकार घेणाऱ्या कोटक महिंद्रा कंपनीच्या अधिकाऱ्यांना योग्य त्या प्रमाणात सहकार्य मिळत नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे येत्या मार्च २०२२ पुर्वी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटीज साठीचा फंड वापरण्याचा आराखडा पुनर्वसन करणाऱ्या कंपन्यांकडून मान्यतेसाठी सादर न झाल्यास या फंडाचा वापर अन्यत्र वळविला जाऊ शकणार आहे. दरम्यान, या काळात ज्यांची घरे बाधित झाली नाहीत, अशांना अधिक पुनर्वसन घरकुले मिळवून देण्याचे मधाचे बोट लावून जि.प. आणि पं.स. च्या निवडणुकीत प्रभाव निर्माण करण्यात येणार आहे. त्यानंतरही राजकीय आणि प्रशासनाच्या मिलीभगतचे स्वरूप दरडग्रस्तांना हक्काची घरकुलं मिळण्यात अडथळा निर्माण करणारी ठरणार आहे.

**साखर सुतारवाडीबाबत गोंधळाची परिस्थिती**

साखर सुतारवाडीच्या पुनर्वसनासाठी एकीकडे पोलादपूरनजिकच्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या सदनिकांचा वापर करण्याचा विचार दिसून येत आहे. तर दुसरीकडे रानबाजिरे धरणालगतच्या परिसरात एमआयडीसीने भुसंपादित करूनही विनावापर ठेवलेल्या जमिनीचा विचार मांडण्यात येत आहे. एमआयडीसीने धरण परिसरातील ज्या जमिनी संपादित केल्या त्यापैकी काही जमिनींच्या सातबारा उताऱ्यावर महसूल विभागाने एमआयडीसीचे संरक्षित क्षेत्र असा उल्लेख न केल्याने अनेक भुमाफियांनी या पुनर्वसनाआडून या जमिनीवर लक्ष केंद्रीत केले आहे. परिणामी, टाटा समूहाने साखर सुतारवाडीमध्ये पुनर्वसन वसाहत बांधण्यासंदर्भात तयारी दर्शवूनदेखील आजतागायत जमिनीची निश्चिती झालेली दिसून येत नाही.

साखर सुतारवाडी आणि केवनाळे या जीवितहानी झालेल्या दोन प्रमुख दरडग्रस्त गावांच्या पुनर्वसनासाठी जमिनी उपलब्ध करून देण्यासंदर्भात होणारा विलंब पुनर्वसनकामी पुढाकार घेण्यासाठी तयार झालेल्या कंपन्यांना या मानसिकतेपासून दूर करण्यास कारणीभूत ठरणार असल्याने राज्याचे पुनर्वसनमंत्री ना.विजय वडेट्टीवार यांनी त्यांच्या विभागामार्फत स्वतंत्रपणे प्रयत्न करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# खालापूर तालुक्यातील गावांचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण सुरू

**खालापूर : प्रतिनिधी**

स्वामित्व योजने अंतर्गत राज्यातील सर्व गावामधील गावठणांचा ड्रोन कॅमेराच्या माध्यमातून सर्वेक्षण करण्यात येणार आहे. खालापूर तालुक्यातही १०३ गावांचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्यात येणार असून, त्याची सुरुवात सोमवारी (दि. २५) माणकिवली गावापासून झाली.

स्वामित्व योजनेमुळे गावकऱ्यांना, शेतकऱ्यांना मालकी हक्क देण्याचा शासनाचा मानस असून जमिनीचे उतारे, नकाशे या योजनेने अचूक मिळणार आहेत. भविष्यात गावठाण जमिनीच्या मालकीची सनद बहाल करण्यात येणार आहे. बँकांचे कर्ज, शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना या सनदीचा वापर करता येईल. राज्य शासनाचे अधिकारी प्रत्यक्ष जमिनीवर जाऊन चुना मार्किंग करणार



आहेत तर चौकशी अधिकारी सर्वे करण्यात आलेल्या जमिनीचे नकाशे तयार करणार आहेत. हे नकाशे जतन केले जाणार असून संबंधीत शेकऱ्यांच्या अनेक पिढ्यांना या नकाशांचा पुरावा म्हणून वापर करता येईल.

खालापूर तालुक्यातील १०३ गावांतील गावठाण क्षेत्राच्या सर्वेक्षणाचे काम ड्रोन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्यात येत आहे. कोकण प्रदेश भूमी अभिलेख उपसंचालक मिलिंद चव्हाण

(छाया : अरुण नलावडे)



यांनी सोमवारी तालुक्यातील माणकिवली गावात ड्रोन कामाचा शुभारंभ केला. रायगड जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सचिन इंगळी यांनी या ड्रोन कामाचे नियोजन केले होते.

खालापूर तालुक्यातील १०३ गावांत ड्रोनद्वारे होत असलेल्या गावठाण सर्वेक्षण कामकाजात जनतेने सहकार्य करावे, असे आवाहन भूमीअभिलेख विभागाचे जिल्हा अधीक्षक सचिन इंगळी व उपअधीक्षक शरद काळे यांनी केले आहे.

# कर्जतमध्ये लस आपल्या दारी!

## अंथरुणाला खिळलेल्या व्यक्तींचे कोरोना लसीकरण

**कर्जत : बातमीदार**

अंथरुणाला खिळल्या आणि दवाखान्यात जाऊन कोरोना डोस घेता येत नसलेल्या कर्जत शहरातील ज्येष्ठ व्यक्तींचे येथील उपजिल्हा रुग्णालय आणि नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने लसीकरण करण्यात येत आहे.

कर्जतला १०० टक्के लसीकरण झालेले शहर बनविण्यासाठी नगर परिषद व उपजिल्हा रुग्णालयाने पुढाकार घेतला गेला आहे. त्यासाठी कवच-कुंडल मोहिमेअंतर्गत घरोघरी जावून लसीकरण करण्यात येत आहे. कर्जत लसीकरण समिती संघर्ष



(छाया : संतोष पेरणे)

समितीच्या आवाहनानंतर नगर परिषद व उपजिल्हा रुग्णालयाच्या वतीने आता दवाखान्यात जाऊन कोरोना डोस घेता येत नसलेल्या ज्येष्ठ व्यक्ती व रुग्णांचे घरोघरी जावून लसीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे कर्जत शहरात कवच कुंडल मोहीम यशस्वी होताना दिसत आहे.

# अझोला वनस्पतीची निर्मिती करा

## ▪ कोकण कृषी विद्यापीठाचे शेतकऱ्यांना आवाहन

**कर्जत : बातमीदार**

कोकण कृषी विद्यापीठाने बायो फर्टिलायझर म्हणून अझोला वनस्पती विकसित केली आहे. या कृषी विद्यापीठाच्या विद्यार्थिनींनी कर्जत तालुक्यातील कुशीवली येथे जाऊन तेथील शेतकऱ्यांना अझोला वनस्पतीबद्दल माहिती देऊन त्या वनस्पतीच्या निर्मितीचे आवाहन केले.

कोकण कृषी विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. उत्तम महाडकर, ग्रामीण उद्योजकता जागृती विकास योजना प्रमुख डॉ. विजय थोरात, पशुसंवर्धन विभागाचे डॉ. नरेंद्र प्रसादे आणि वनस्पतीरोगशास्त्र विभागाचे डॉ. राजेश राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली या महाविद्यालयातील कृषी पदविका विद्यार्थिनींनी ग्रामीण उद्योजकता जागृती विकास योजने अंतर्गत कुशीवली गावात जनजागृती मोहीम राबविली. तेथील संतोष विचारे, दत्तात्रय देशमुख आणि अन्य पाच शेतकऱ्यांच्या उपस्थितीत सुप्रिया सोमनाथ गारे आणि दिव्या राजू देवकर या कृषी विद्यार्थिनींनी अझोला



**कर्जत कुशीवलीत विद्यार्थिनींची प्रात्यक्षिके**

वनस्पतीचे उत्पादन कसे करावे याचे प्रात्यक्षिक दाखवून माहिती दिली.

अझोला ही वनस्पती एक प्रकारचे जैविक खत म्हणून काम करीत असून भात पिकाच्या उत्पादन वाढीसाठी वापरले जाते. अझोला वातावरणातील नत्र भाताला उपलब्ध करून देते तसेच यामुळे उत्पादनात २० टक्के वाढ होते. त्याचबरोबर पशूखाद्य म्हणूनही अझोलाचा वापर केला जातो.

गायी व म्हशींना दररोज अझोला खाऊ घातल्याने त्यांच्या दूध उत्पादनात वाढ होते. कोंबड्यांना दररोज अझोला दिल्याने त्यांच्या मांसाच्या प्रमाणात वाढ होते, अशी माहिती देतानाच सुप्रिया गारे आणि दिव्या देवकर विद्यार्थिनींनी या बद्दल प्रात्यक्षिकेदेखील सादर केली.

(छाया : महेंद्र खैरे)



# नितीन खारकर राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

**रेवदंडा : प्रतिनिधी**

तालुक्यातील पुतूबाईचापाडा येथील नितीन रवींद्र खारकर यांना नुकतेच राष्ट्रीय फिल्म २०२१ पुरस्काराने उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले.

राधा या मुव्हीसाठी नितीन खारकर यांना ६७व्या राष्ट्रीय फिल्म पुरस्कार वितरण सोहळ्यात बेस्ट एनिमेटर म्हणून गौरवण्यात आले. खारकर यांच्या या यशाने अलिबाग तालुक्यातील पुतूबाईचा पाडा ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## नेरळमध्ये मिशन युवा स्वास्थ्य

# टिपणीस महाविद्यालयातील ९५ टक्के विद्यार्थ्यांचे लसीकरण

**कर्जत : बातमीदार**

विद्या मंदिर मंडळाच्या नेरळ येथील मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस वरिष्ठ महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी शाळा व्यवस्थापन आणि प्राथमिक आरोग्य केंद्राकडून मिशन युवा स्वास्थ्य राबविण्यात आले. या मोहीमेत महाविद्यालयातील १८ वर्षावरील ९५ टक्के विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले.

मातोश्री टिपणीस महाविद्यालयातील लसीकरण



मोहिमेचे उद्घाटन विद्या मंदिर मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. जी. लाड यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मंडळाचे कोषाध्यक्ष विवेक पोतदार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार इंगळे, नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. सागर काटे, डॉ. पवार, नेरळ उच्च माध्यमिक महाविद्यालयाचे प्रा. सागर मोहिते, प्रा. अमोल सोनवणे, प्रा. संतोष तुकमाने, प्रा. सोनम गुप्ता, डॉ. स्नेहल देशमुख, अनंत घरत, वैभव बोराडे, विकास घारे, जागृती घारे, दुराज टिवाळे, नेरळ विद्या मंदिराचे प्राचार्य प्रमोद विचवे आदी उपस्थित होते. या मोहिमेंतर्गत एकूण ६० विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले.

# कर्जतमधील दामत गावातील कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील दामत या मुस्लिमबहुल गावातील कार्यकर्त्यांनी आमदार निरंजन डावखरे यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

भाजपचे कर्जत तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर आणि नितीन कांदळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली दामत गावातील ताहीद खान, रातीक खान, बबलू नजे, इरशाद आढाळ, आकिल नजे, ओमर नजे, वसिम बोस्तेकर, इजाझ नजे, याकुब आढाळ, सुफी आढाळ, कयुम तिवाळे, इमरान नजे, सद्दाम काजी, अरफात पोजेकर, चाचू सफरान, मोसिन नजे, जलाल काजी, सहबाज नजे, कैफ खोत, सलमान नजे, सुफियान नजे, इजाझ तिवाळे, फयझान आढाळ, अरफाज आढाळ, अलताफ तिवाळे, आरतिक आढाळ, फैजान आढाळ, अब्दुल्ला तिवाळे, मोसीन नजे, रितिक आढाळ, सिराज नजे, कयुम टिवाळे, तेजपाल नजे, अलताफ नजे, मोबीन नजे या कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

(छाया : संतोष पेरणे)



भाजपचे रायगड जिल्हा संघटन मंत्री अविनाश कोळी, कर्जत तालुका सरचिटणीस राजेश भगत संजय कराळे, युवामोर्चाचे किरण ठाकरे, ऋषिकेश जोशी, भाजप नेरळ शहर माजी अध्यक्ष अनिल जैन, अनिल पटेल, भाजप अल्पसंख्यांक सेलचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष अब्दुल हक नजे, समीर नजे यांच्यासह पक्ष कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

## बोर्लेतील दोन वर्षीय बालकाचे अपहरण

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील बोर्ले गावातील दोन वर्ष तीन महिन्याच्या बालकाला मंगळवारी (दि. २६) संध्याकाळी संतोष अशोक यादव (वय ३०) याने पळवून नेल्याची तक्रार सुनील बारीकराव यादव (वय ४२) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात केली आहे.

बोर्ले गावातील रुद्र अरुण यादव (वय २) हा मुलगा मंगळवारी संध्याकाळी सुनील यादव यांच्या घराच्या समोरील अंगणात खेळत होता. त्यावेळी संतोष यादव हा होंडा शाईन मोटारसायकल (एमएच-०६,बीएक्स ८८२४) घेवून तेथे आला. त्याने रुद्र याच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन त्याला जबरदस्तीन पळवून नेले. रुद्र याचा रंग गोरा, केस लहान, उंची सुमारे दोन फूट, अंगात पिवळ्या रंगाचा टीशर्ट व निळ्या रंगाची हाप पॅन्ट, गळ्यामध्ये सोन्याचे लॉकेट असलेला नऊरंगी दोरा बांधला आहे.

# कळंब येथे भाताच्या मोळ्यांना आग

## शेतकऱ्याचे दीड लाखाचे नुकसान



**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील कळंब येथील शेतकऱ्याने शेतात गोळा करून ठेवलेल्या भाताच्या मोळ्यांना मंगळवारी (दि. २६) संध्याकाळी आग लागली. या आगीत ३०० मोळ्या जळून खाक झाल्या. नेरळ पोलिसांनी केलेल्या पंचनाम्यानुसार ताहीर अब्दुल अजीज लोगडे या शेतकऱ्याचे दीड लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

कळंब येथील ताहीर लोगडे यांची बोरगाव रोडला भातशेती असून सध्या भाताच्या पिकाची कापणी सुरू आहे. त्याची साठवण ताहीर लोगडे हे त्याच भागात करीत होते. मंगळवारी संध्याकाळी ताहीर लोगडे शेतावरुन आपल्या घरी परतले. त्यानंतर त्यांच्या शेत जमिनीत साठवून ठेवलेल्या भाताच्या मोळ्यांना आग लागली असल्याची माहिती त्यांना मिळाली. ताहीर यांच्यासह ग्रामस्थ बोरगाव रोडवरील शेतावर पोहचले, त्यावेळी भाताच्या दोन गंजी यांनी पेट घेतला होता. ग्रामस्थांच्या प्रयत्नानंतर आठ वाजता आग विझली आणि सर्व घरी परतले. मात्र रात्री पुन्हा आग भडकली आणि त्यात ताहीर लोगडे यांच्या भाताच्या ३०० मोळ्या जळून खाक झाल्या.

स्थानिकांनी नेरळ पोलीस ठाणे आणि कर्जत तहसीलदार यांना आगीबाबत माहिती दिली. त्यानंतर नेरळ पोलीस ठाण्याचे कर्मचारी रात्रीच घटनास्थळी दाखल झाले. तर बुधवारी सकाळी नायब तहसीलदार यांनी ताहीर लोगडे यांच्या जळालेल्या भाताच्या मोळ्यांची पाहणी केली. नेरळ पोलिसांनी केलेल्या पंचनाम्यात या आगीत दीड लाख रुपयांचे नुकसान झाले असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

# आपण भ्रष्टाचार रोखू शकतो –सुषमा सोनावणे

**खालापूर : प्रतिनिधी**

भ्रष्टाचार रोखण्यासाठी अनेक कायदे आहेत. परंतु त्याबाबत असलेले आपले हक्क जाणून घेतले तर जनता नक्कीच लाच देण्याचा प्रस्ताव स्वीकारणार नाही, असा विश्वास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगडच्या पोलीस उपअधीक्षक सुषमा सोनावणे यांनी बुधवारी (दि. २७) खोपोली व्यक्त केला.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त सहजसेवा फाउंडेशनच्या वतीने बुधवारी खोपोलीतील लोहाना सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात सुषमा सोनावणे उपस्थितांना मार्गदर्शन करीत होत्या.



केंद्रीय लोकसेवेतील अधिकारी हे शासनाच्या अधिपत्याखाली कार्यरत असल्यास त्यांच्यावर आम्ही कारवाई करू शकतो, तर शासकीय अधिकारी ते लोकप्रतिनिधी यांनी शासकीय कामे करताना लाच घेतल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा सुषमा सोनावणे यांनी या वेळी दिला.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगडचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी निरनिराळी उदाहरणे देत लाचलुचपत प्रतिबंधक कायदे व त्यांची अंमलबजावणी सोप्या भाषेतून समजून सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहजसेवा फाउंडेशनच्या उपाध्यक्षा इशिका शेलार यांनी केले.

फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, अखिलेश पाटील, वर्षा मोरे, संतोष गायकर, बी. निरंजन, जयश्री कुलकर्णी, सलमान शेख, आयुब खान, आशा देशमुख, विशाल शिर्के, मोहन केदार, आसिफ खान, आसमा पटेल, शीतल गायकवाड यांच्यासह खोपोलीतील विविध संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक, पत्रकार, पोलीस पाटील संघटनेचे पदाधिकारी आणि विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# कर्ज मेळाव्याचा लाभ घेऊन नागरिकांनी उद्योग–व्यवसायात यशस्वी व्हावे –शंपा बिश्वास

**कर्जत : प्रतिनिधी**

कोरोना संकटात ग्राहक आणि कर्ज देणाऱ्या बँकांची दरी वाढली होती. ती दरी मिटावी, यासाठी हा कर्ज मेळावा आयोजित केला आहे. दुर्गम भागातील गरीब व गरजू जनतेला व्यवसाय किंवा अन्य कामासाठी बँकांकडून सहकार्य घेऊन मदत करण्याचा आमचा हेतू असून त्यासाठी आम्ही आपल्या दारी आलो आहोत. त्याचा लाभ घेऊन आपण उद्योग व्यवसायाला लागावे, असे आवाहन बँक ऑफ इंडियाच्या रायगड विभाग प्रमुख शंपा बिश्वास यांनी बुधवारी (दि. २७) कर्जत येथे केले.

(छाया : विजय मांडे)



बँक ऑफ इंडिया या जिल्हा अग्रणी बँकेतर्फे बुधवारी कर्जतमधील रॉयल गार्डनच्या सभागृहात कर्ज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. शंपा बिश्वास यांनी या मेळाव्याचे उद्घाटन केले.

शेतकऱ्यांचे कौशल्य व शेती उत्पादनाची बाजारपेठ यांचा मेळ बसला तर शेती उद्योग भरभराटीला येईल, असा विश्वास विस्तार कृषी शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी या वेळी व्यक्त केला. जिल्हा कृषी अधिकारी उज्वला बानखेले यांनी या मेळाव्यात सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग व कृषी पायाभूत सुविधांची सविस्तर माहिती दिली.

### कर्जतमध्ये जिल्हा अग्रणी बँकेचा उपक्रम


या कर्ज मेळव्यात आठ बँका सहभागी झाल्या असून ६६ जणांना दोन कोटी शहात्तर लाख रुपयांचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक विजय कुलकर्णी यांनी दिली. कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, मनोहर पादिर यांची या वेळी समयोचीत भाषणे झाली.

स्नेहल हंडगर यांनी सूत्रसंचालन केले. तर सौम्या गुज्जर यांनी आभार मानले. मार्केटिंग जिल्हा व्यवस्थापक सिद्धेश राऊळ, तालुका व्यवस्थापक राजू नेमाडे, रमण पारकर, राम ब्रह्मांडे, गौरव पांडे, सुरेंद्र उपाध्ये, विशाल पाटील, दिलीप बडेकर, मनोहर हरपुडे, अरुण वेहले, जयवंत मते यांच्यासह ग्राहक व बचत गटाच्या महिला या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे रायगडात दक्षता जनजागृती अभियान

**अलिबाग : प्रतिनिधी**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे रायगड जिल्ह्यात दक्षता जनजागृती अभियान आयोजित करण्यात आले आहे. या अभियानास २६ ऑक्टोबरपासून प्रारंभ झाला असून १ नोव्हेंबरपर्यंत सुरु राहणार आहे, अशी माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगडच्या पोलीस उपअधीक्षक सुषमा सोनावणे यांनी दिली.



सरकारी कार्यालयात चालणारा भ्रष्टाचार रोखण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक कायदा करण्यात आला आहे. त्याची महिती सर्वसामान्य जनतेला करून द्यावी. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कामकाज कसे चालते यांची माहिती जनतेला देणे हा या अभियानाचा हेतू आहे. यासाठी जिल्ह्यात विविध ठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. पोलीस कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांसाठी विशेष स्पर्धा आयोजित केली जाणार आहे, असे सुषमा सोनावणे यांनी सांगितले.

रायगड जिल्ह्यात चालु वर्षात लाचलुचपत विभागाने नऊ कारवाया केल्या. गेल्यावर्षी पाच कारवाया करण्यात आल्या होत्या. चार वर्षांमध्ये एकूण ३४ कारवाया करण्यात आल्या. ही सर्व प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत, अशी माहिती त्यांनी या वेळी दिली.

सरकारी काम करण्यासाठी कुणी लाच मागत असेल तर पोलीस उपअधीक्षक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगड, पिंपळभाट, अलिबाग येथे प्रत्यक्ष भेटून किंवा ०२१४१ –२२२३३१, ९७०२७०६३३३, ९२८४३८९२८९, ९७३०२७१५६० येथे संपर्क साधावा, असे आवाहन सुषमा सोनावणे यांनी केले आहे.

# ‘आरोग्य संवर्धनासाठी सकारात्मक दृष्टिकोन बाळगावा’

**अलिबाग : प्रतिनिधी**

महिलांनी सकारात्मक दृष्टिकोन बाळगून आपल्या आरोग्याचे संवर्धन करावे. योग्य आहार–विहार आणि छंदांत आपल्याला गुंतवून घ्यावे, असे आवाहन स्त्रीरोग, प्रसुती व वंधत्व तज्ज्ञ डॉ. मेघा घाटे यांनी मंगळवारी (दि. २६) पोयनाड येथे केले.

लायन्स क्लब पोयनाड आणि लायन्स व्हिजन अॅण्ड हेल्थ क्लिनीक यांच्या संयुक्त विद्यमाने पोयनाड येथील अग्रसेन भवनात सर्व वयोगटातील स्त्रिया व वयात आलेल्या मुलींसाठी मोफत आरोग्य निदान शिबिर आयोजिण्यात आले होते. या शिबिरात डॉ. मेघा घाटे यांनी ७० महिला व मुलींची आरोग्य तपासणी केली. त्यावेळी त्या मार्गदर्शन करीत होत्या.

लायन्स क्लब पोयनाडचे अध्यक्ष प्रमोद पाटील, उपाध्यक्ष विनोद पाटील, सचिव प्रगती सिनकर, खजिनदार विकास पाटील, नोडल ऑफिसर प्रदीप सिनकर, डिस्ट्रिक चेअरपर्सन मनीष अग्रवाल, अरविंद अग्रवाल, तसेच महेंद्र पाटील, संतोष पाटील, ज्योती पाटील, ममता अग्रवाल, नीलम माळी आदींसह इतर सदस्यांनी शिबिर यशस्वितेसाठी मेहनत घेतली.




## नमुना एन. डी.

(नियम ९२(३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH46/6304B2016 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 AC4158 चे मालक **कै. भगवान रामभाऊ दहातोंडे** यांचे तारीख २४/१०/२०२० रोजी निधन झालेले आहे.

मी सिंधु भगवान दहातोंडे, रा. कोळखे पेठ, रुम नं. ३, पो. ओएनजीसी, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – सिंधु भगवान दहातोंडे**
**पत्ता– कोळखे पेठ, रुम नं. ३, पो. ओएनजीसी,**
**ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमचे अशिलांची मालकीची मौजे– मोसारे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत जिचे विद्यमान मालक १) अनु अरूण कातकरी, २) अंकुश अरूण कातकरी, ३) चाहू बबन कातकरी, ४) बामा जानू कातकरी, ५) शंकर एकनाथ कातकरी उर्फ नाईक, रा. मौजे–मोसारे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड यांचेकडून ९९ वर्षाचे करार करण्यांचे ठरविले आहे.

सदर मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| मोसारे, ता. पनवेल | ८८/६ | जिरायत ०–१६–५०<br>पोटखराबा ०–०२–० | ४.२५ |
| | | एकूण क्षेत्र ०–१८–५० | |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या कायम खरेदी कराराचे व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येऊन आमचे अशिल वरील मिळकतीच्या ९९ वर्षाचे करारान्वये व्यवहार पूर्ण करतील, मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**दिनांक : २७/१०/२०२१**

**सही/–**
**ॲड. कांचन एस. पाटील**
**पत्ता :– १३३७ बी, रुम नं. २, शिवाजी पाटील निवास, प्रभूआळी, जुने पनवेल, जि. रायगड ४१०२०६.**
**फोन : ८६८९८०९८९६, ८१०८८८२६११**

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**

## ई-निविदा क्र. ५२ सन २०२१-२२

खालील कामाच्या ई–निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल दूरध्वनी क्रमांक ०२२/२७४५२७७८ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पनवेल यांचेकडून दिनांक ०३.११.२०२१ ते १७.११.२०२१ पर्यंत १०.०० ते १८.०० वाजेपर्यंत देण्यात येईल. कार्यकारी अभियंता हे ठेकेदाराने भरून पाठविलेल्या निविदा दिनांक २३.११.२०२१ रोजी त्या दिवशी ११.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्य झाल्यास त्या दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत (रु.लक्ष) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमुना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| 1 | Renovation of Executive Engineer's Cabin P.W. Division, Panvel Dist. Raigad | 2.64 | 3000.00 | 01 Months | B-1 | 230/- | IX & above |
| 2 | Construction of road at Mouje Kelawali Aadivasiwadi in GP Kelawali Tal. Khalapur, Dist. Raigad | 6.78 | 7000.00 | 03 Months | B-1 | 600/- | VIII & above |
| 3 | FDR to Improvement of Chowk-Asare-Khalapur road MDR-22 with Construction of New Pipe Culvert at Ch.0/800 Km. Tal. Khalapur, Dist. Raigad | 8.74 | 9000.00 | 03 Months | B-1 | 600/- | VIII & above |
| 4 | FDR to Panvel Wavanje road SH-85 Pot Holes Filling in Km. 2/00 to 8/600 and 10/500 to 16/400 Tal. Panvel, Dist. Raigad | 7.96 | 8000.00 | 03 Months | B-1 | 600/- | VIII & above |
| 5 | FDR to Chipale Morbe Chindran Devichapad road MDR-13 Pot Holes Filling in Km. 0/00 to 14/00 Tal. Panvel, Dist. Raigad | 8.40 | 9000.00 | 03 Months | B-1 | 600/- | VIII & above |
| 6 | Construction of Community Hall at Chochi (GP Bid) Tal. Karjat, Dist. Raigad | 6.93 | 8000.00 | 01 Months | B-1 | 600/- | VIII & above |
| 7 | Construction of internal road at Jamrung (GP Jamrung) Tal. Karjat, Dist. Raigad | 6.99 | 7000.00 | 03 Months | B-1 | 600/- | VIII & above |
| 8 | Construction of concrete road from Bhairavanath Mandir to Main road at Ashane (GP Umroli) Tal. Karjat, Dist. Raigad | 8.90 | 9000.00 | 03 Months | B-1 | 600/- | VIII & above |
| 9 | Construction of Ganpati Visarjan Ghat at Bekare (GP Bekare) Tal. Karjat, Dist. Raigad | 6.21 | 7000.00 | 03 Months | B-1 | 600/- | VIII & above |

**टिप :–**

१. तपशिलवार निविदा सूचना कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयीन फलकावर पहावयास मिळेल. तसेच कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास निविदा सूचनेची प्रत विनामुल्य मिळू शकेल.

२. कोणतेही एक अगर सर्व निविदापत्रके कोणतेही कारण न दाखविता नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे. कोरे निविदापत्रक घेण्याकरिता केलेल्या अर्जासह वैध असलेले नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**सही/–**
**कार्यकारी अभियंता,**
**सा. बां. विभाग, पनवेल**

**विमाका/कोवि/२०२१–२०२२/१९३**

# द. आफ्रिकेची विंडीजवर मात



**दुबई : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत गजविजेत्या वेस्ट इंडिज संघाचा सलग दुसरा पराभव झाला आहे. मंगळवारी झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने विंडीजवर मात केल्याने त्यांचा पुढचा प्रवास खडतर झाला आहे. विंडीजने आठ गडी गमवून १४३ धावा केल्या होत्या. हे आव्हान द. आफ्रिकेने दोन गडी गमावून १८ षटके आणि दोन चेंडूंत पूर्ण केले.

विंडीजने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना आफ्रिकेला पहिल्याच षटकातच धक्का बसला. टेम्बा बवुमा धावचीत होत तंबूत परतला. त्यानंतर दुसऱ्या गड्यासाठी रीझा हेन्ड्रिक्स आणि रस्सी वॅनदर दुस्सेनने अर्धशतकी भागीदारी केली. ही जोडी फोडण्यात अकिल होसैनला यश आले. रीझाने ३० चेंडूंत ३९ धावा केल्या. त्यानंतर दुस्सेन आणि मारक्रमने विजयी भागीदारी करीत संघाला विजय मिळवून दिला. मारक्रमने २६ चेंडूंत नाबाद ५१ धावा केल्या. त्याने चार षटकार आणि दोन चौकार मारले, तर दुस्सेनने ५१ चेंडूंत नाबाद ४३ धावा केल्या.

तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना विंडीजच्या लेंडी सिमॉन्स आणि इविन लेव्हिसने पहिल्या गड्यासाठी ७३ धावांची भागीदारी केली. सिमॉन्स (१६) रबाडाच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाला. त्यानंतर केशव महाराजच्या गोलंदाजीवर पूरन १२ धावा करून तंबूत परतला. दुसरीकडे इविनने आपले अर्धशतक झळकावले. त्याने ३५ चेंडूंत ५६ धावा केल्या. महाराजच्याच गोलंदाजीवर तो बाद झाला. त्यानंतर ख्रिस गेल (१२), आंद्रे रसेल (५), शिमरॉन हेटमायर (१) फारशी चमक दाखवू शकले नाहीत. किएरॉन पोलार्डने आक्रमक खेळी करत मोठी धावसंख्या उभारण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यालाही (२६) अपयश आले. त्यानंतर लगेचच दुसऱ्या चेंडूवर हेडन वॉल्श बाद झाला. त्यामुळे विंडीज संघ १५०चा टप्पा गाठू शकला नाही.

## पाकिस्तानकडून न्यूझीलंड पराभूत



**शारजा : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत भारताविरुद्ध संस्मरणीय विजय नोंदवल्यानंतर पाकिस्तानने न्यूझीलंडला पाच गड्यांनी मात दिली. पाकिस्तानने न्यूझीलंडला २० षटकांत ८ बाद १३४ धावांवर रोखले. त्यानंतर १९व्या षटकात विजय साकारला.

शारजाहच्या खेळपट्टीवर वेगवान गोलंदाज हरिस रौफ, शाहीन आफ्रिदी यांनी किवी फलंदाजांना फटकेबाजी करू दिली नाही. रौफने चार बळी घेतले. प्रत्युत्तरात संथ खेळपट्टीवर पाकिस्तानने आपले आपले पाच गडी गमावले, पण अनुभवी शोएब मलिक (२६) आणि आसिफ अली (२७) यांनी आक्रमक खेळी करीत विजयावर शिक्कामोर्तब केले. न्यूझीलंडकडून ईश सोधीने सर्वाधिक दोन बळी घेतले. रौफला सामनावीर पुरस्कार देण्यात आला. या विजयासह पाकिस्तानने गट-२मध्ये पहिले स्थान मिळवले आहे.

## आरोग्य प्रहर

### काळा लसूण आरोग्यासाठी सुपरफूड

लसूण सामान्यतः पाककृतीमध्ये वापरला जातो. याचे अनेक आरोग्यदायी फायदेदेखील आहेत. हे औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. हे एक सुपरफूड आहे जे मोठ्या प्रमाणात पोषक तत्व प्रदान करते. त्याची चव खूप तिखट असते. हे सहसा वेगळे खाल्ले जात नाही, परंतु इतर मसाल्यांच्या स्वरूपात आणि कमी प्रमाणात खाल्ले जाते. याशिवाय लसणाचा आणखी एक पर्याय आहे, तो म्हणजे काळा लसूण. त्याचा वास खूप स्ट्राँग आहे आणि चव इतका तिखट नसते, पण हळूहळू हे जगातील लोकांच्या आरोग्यासाठी सुपरफूड म्हणून उदयास येत आहे.



**काळ्या लसणाचे गुणधर्म**

काळ्या लसूणमध्ये उच्च रक्तदाबाशी लढण्याची क्षमता असते. त्यात प्रथिने आणि बी जीवनसत्त्वेही भरपूर असतात, परंतु त्या व्यतिरिक्त, हे कोलेस्टेरॉल, टाईप २ मधुमेह, थकवा आणि तणाव यांचा धोका कमी करण्यासाठी सुपरफूड म्हणून काम करते.

काळ्या लसणात अँटिऑक्सिडेंट गुणधर्म आहेत. हे पचन उत्तेजित करते, ऊर्जा प्रदान करते आणि रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करते.

काळ्या लसणीमध्ये बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ आणि जंतुनाशक गुणधर्म असतात. याशिवाय यात व्हिटॅमिन सी असते. हे व्हायरस आणि बॅक्टेरियापासून संरक्षण करण्यास मदत करते.

काळा लसूण अमिनो ॲसिड पुरवतो. यामध्ये आर्जिनिन आणि ट्रिप्टोफॅनचा समावेश आहे. अमिनो आम्ल एक आवश्यक घटक आहे आणि शरीर हे स्वतः बनवत नाही. त्यामुळे त्याचा आहारात समावेश करणे आवश्यक आहे. यामुळेच त्याला सुपरफूड म्हणून ओळखले जाते. त्यामुळे हृदयविकार टाळण्यास मदत होते. हे रक्तवाहिन्यांची स्थिती सुधारण्यास मदत करते, कारण ते रक्तातील ट्रायग्लिसराइड्स आणि कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी करते.

काळ्या लसणाचा आणखी एक गुण म्हणजे तो प्रथिने आणि कोलेजनचा स्रोत आहे. कोलेजन त्वचेच्या आरोग्यासाठी महत्वाचे आहे. प्रथिने सांधे आणि हाडे मजबूत करण्यास मदत करतात.

काळ्या लसणीचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. हे अनेक प्रकारच्या पदार्थांमध्ये वापरले जाते. हे जेवणात एक विशेष चव जोडते. काळे लसूण सॅलड, चिकन, टोस्ट किंवा पास्तामध्ये वापरले जाते.

## भारत वर्ल्डकप जिंकेल!

■ ब्रेट लीचे भाकीत



**मेलबर्न : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू ब्रेट लीने यंदाचा वर्ल्डकप भारत जिंकेल, असे भाकित वर्तविले आहे. कदाचित यंदा भारत-ऑस्ट्रेलिया अंतिम सामना होईल, असेही त्याने म्हटले आहे.

भारतीय संघाविषयी बोलताना ली पुढे म्हणाला की, आराम करा, सर्व काही ठीक होईल. जर त्यांना त्यांच्या क्षमतेवर आणि प्रतिभेवर विश्वास असेल तर ते चांगले खेळतील.

भारत तीन फिरकीपटूंना खेळवू शकला असता, मात्र भुवनेश्वर आणि मोहम्मद शमी चांगले गोलंदाज आहेत. जर त्यांना यश मिळाले नाही तर कुणाला मिळणार? टीम चांगली होती, मात्र यासाठी पाकिस्तान संघाला श्रेय दिले पाहिजे. ते चांगले खेळले. मला वाटते भारतासाठी एकमात्र विराट कोहली होता. त्याने अर्धशतक झळकावले तसेच आफ्रिदीच्या गोलंदाजीवर षटकार ठोकला. माझ्या मते ते योग्य होते.

के. एल. राहुल अपयशी ठरला. त्याने आयपीएलमध्ये चांगल्या धावा केल्या होत्या, मात्र आयपीएलमध्ये त्याने अतिरिक्त वेगवान गोलंदाजीचा सामना केला नव्हता, असेही ली म्हणाला.

## पॉवरलिफ्टिंग निवड चाचणी

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने निवड चाचणी स्पर्धा नुकतीच खोपोलीतील केएमसी कॉलेज येथे शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त मारुती आडकर यांच्या उपस्थितीत झाली.


या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून रोशन निलदे उपस्थित होते. त्याचप्रमाणे पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे गिरीश वेदक, राष्ट्रीय खेळाडू माधव पंडित, राहुल गजरबल, अरुण पाटकर हजर होते.

या निवड चाचणी स्पर्धेत श्रुती मोरे, (सब ज्यु.) अमृता भगत (ज्यु.) या स्ट्रामा गर्लच्या, तर मयांकर पवार (सब ज्यु.), शुभंग कांगले (ज्यु.) स्ट्राँग बॉईज या किताबाचे मानकरी ठरले.

## सांगवान, थापा जागतिक बॉक्सिंग स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत

**बेलग्रेड : वृत्तसंस्था**

भारताच्या आकाश सांगवान (६७ किलो) आणि शिवा थापा (६३.५ किलो) यांनी एआयबीए जागतिक पुरुष बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. पदार्पणवीर रोहित मोरला यानेही विजयी सलामी दिली.





राष्ट्रीय स्पर्धेतील गतविजेत्या आकाशने पहिल्या फेरीत तुर्कीच्या फुर्कान अदेमचा ५-० असा धुव्वा उडवला, तर थापाने केनियाच्या व्हिक्टर न्यादेरालाही ५-० अशी धूळ चारली. त्याआधी ५७ किलो वजनी गटात रोहितने इक्वेडोरच्या जीन कैसेडोचा पराभव करीत भारताला विजयी सुरुवात करून दिली. याव्यतिरिक्त दीपक भोरियाने ५१ किलो वजनी गटात किर्गीस्तानच्या अजत उसेनालिएव्हचा ५-० असा फडशा पाडून पुढील फेरीतील स्थान सुनिश्चित केले.

भारताच्या सचिन कुमार (८० किलो) आणि आशियाई विजेता संजीत (९२ किलो) यांना पहिल्या फेरीत पुढे चाल मिळाली. सचिनची पहिली लढत ३० ऑक्टोबरला, तर संजीतची पहिली लढत २९ ऑक्टोबरला होईल. ५१ किलो वजनी गटात दीपक कुमार पहिल्या फेरीत अझात उसेनालीव्हविरुद्ध लढेल.






**पनवेल : स्व. लक्ष्मणशेठ पाटील आणि स्व. अविनाश म्हात्रे-पाटील यांच्या स्मरणार्थ नावडे येथील जि. प. शाळेत सचिन लक्ष्मणशेठ पाटील व ग्रामस्थ मंडळाच्या वतीने लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या सहकार्याने नेत्रतपासणी शिबिर व मोफत चष्मे वाटप उपक्रमाचे आयोजन बुधवारी करण्यात आले होते. या उपक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या वेळी त्यांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले. सचिन पाटील, नारायण म्हात्रे, विष्णू म्हात्रे, शैलेश म्हात्रे, संतोष विष्णू म्हात्रे, रमेश म्हात्रे, एकनाथ म्हात्रे, कुणाल म्हात्रे, अनंता म्हात्रे, राजेश खानावकर, प्रशांत म्हात्रे, पंकज म्हात्रे, धीरज म्हात्रे, अरुण गवळी, निलेश म्हात्रे, राजेश म्हात्रे, भालचंद्र खानावकर, मदन खानावकर, रवींद्र खानावकर, राम खानावकर, लक्ष्मण खानावकर, यशवंत ठाकूर, विनोद खानावकर, विशाल खानावकर आदी उपस्थित होते.**








## भावपूर्ण श्रध्दांजली



**होमविधी**
गुरुवार दि.२८/१०/२०२१ रोजी सकाळी ०९.०० वा.
राहत्या घरी वहाळ येथे होणार आहे.

**दशक्रिया**
गुरुवार दि.०४/११/२०२१ रोजी सकाळी ०९.०० वा.
श्री क्षेत्र लांगेश्वर मोरावे येथे होणार आहे.

**उत्तरकार्य**
रविवार दि.०७/११/२०२१ रोजी दुपारी १२.०० वा.
राहत्या घरी वहाळ येथे होणार आहे.

**स्व.भरत (डॅडी) बाळूशेठ पाटील**

यांचे मंगळवार, दि. २६/१०/२०२१ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.
त्यांच्या पवित्र आत्म्यास चिर:शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**शोकाकुल : पाटील परिवार**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com